CMYK

**LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी**
*तालुका, शहर व गावनिहाय प्रतिनिधी नेमणे आहे*
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

बीड वर्ष ३५ वे अंक ३२१ वा फोन २३०१०१ दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ रविवार
गंमत भंडारी
ई-पेपर : www.parshvbhumi.com
Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501
पाने ६ किंमत ४रु.

**रियांश एन्टरप्राईजेस**
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही., ५०% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.९२ व ९३ सारडा सेंट्रल, डि.पी. रोड, बीड.
Mob.9511511818

# गडकरी बावनकुळेंना म्हणाले, निष्ठावंत कार्यकर्त्यांना घरकी मुर्गी दाल बराबर समजू नका अन्यथा वेगाने खाली आपटू



**बीड दि.२५ (प्रतिनिधी):– केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी प्रामाणिक निष्ठावंत कार्यकर्त्यांना 'घर की मुर्गी दाल बराबर' समजू नका, त्यांचा मानसन्मान राखा अन्यथा जेवढ्या वेगाने वर गेलो तेवढ्याच वेगाने खाली आपटाल असा सल्ला देऊन भाजपच्या इनकमिंगवर नाराजी व्यक्त केली आहे.**



यावरून भाजपमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे. अनेकांनी गडकरी यांच्या वक्तव्याचे जोरदार समर्थन केले आहे. बाहेरच्यांना डोक्यावर बसवू नका अशी मागणी केली जात आहे. यावर भाजपचे नेते आणि राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, हे खरे आहे आणि नितीन गडकरी यांची सूचना आम्हाला मान्य आहे.
भाजप आणि शिवसेनेने सत्ता स्थापन केली होती. युतीकडे बहुमत असताना अजित पवार यांनाही सोबत घेतले. त्यावेळी मोठी नाराजी व्यक्त करण्यात आली होती. विधानसभेची निवडणुका महायुतीने सोबत लढली. पुन्हा तीन पक्षांचे सरकार स्थापन झाले आहे. बाहेरच्यांना मोठमोठी पदे दिली जात असल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये असंतोष आहे.

विधानसभेच्या निवडणुकीत सावनेर विधानसभा मतदारसंघात भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष डॉ. राजीव पोतदार प्रमुख दावेदार होते. मात्र त्यांना डावलण्यात आले. भाजप, काँग्रेस परत भाजप असा प्रवास करणारे आशिष देशमुख यांना उमेदवारी दिली. हाच धागा पकडून शुक्रवारी नितीन गडकरी यांनी सावनेर विधानसभा मतदारसंघातील कमळमेश्वर येथे झालेल्या रस्त्याच्या भूमिपूजनाच्या कार्यक्रमात बाहेरच्यांना डोक्यावर घेताना निष्ठावंतावर अन्याय करू नका असा सल्ला भाजपच्या नेत्यांना दिला होता. यावेळी चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. त्यांनाच उद्देशून गडकरी यांनी निष्ठावंत व प्रामाणिक कार्यकर्त्यांना जपा, त्यांच्यावर अन्याय होऊ देऊ नका असा सल्ला दिला होता. अनेक विषय पेंडिग आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि बावनकुळे हे पोतदार यांच्यावर झालेला अन्याय दूर करतील अशी आशाही व्यक्त केली. त्यांच्या वक्तव्याचे राजकीय पडसाद उमटले आहेत. पान २ वर

## दामिनी पथकाची कॉफी' शॉप वर कारवाई

### ११ मुलाविरुद्ध कारवाई



बीड दि.२५ (प्रतिनिधी) :- बीड आणि गेवराई शहरात दामिनी पथकाच्या पोलिसांनी शनिवारी मोठी कारवाई केली. यामुळे कॉफीज सेंटर चालकाचे धाबे दणाणले आहे. काफी सेंटर च्या ठिकाणी अनैतिक आणि गुन्हेगारी वाढत असल्याने या प्रकरणी कठोर कारवाईची मागणी करण्यात आले आहे.
ऐन दिवाळीच्या काळात दामिनी पथकाने कॉफी शॉप चेक करण्याची मोहीम सुरू केली आहे. शनिवारी दुपारी बीड शहर तसेच गेवराई मधे पेट्रोलिंग दरम्यान कॉफी शॉप चेक केले असता, कॉफी शॉपमधे गैरवर्तन करत असणाऱ्या ११ मुलांवर पोलिस ठाणे गेवराई येथे मुंबई पोलीस अधिनियम पान २ वर

## फडणवीस–जरांगे आज पहिल्यांदाच एकाच व्यासपीठावर

मंगळवेढा दि.२५ (वृत्तसेवा):- मराठा आंदोलक मनोज जरांगे आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





हे पहिल्यांदाच एकाच व्यासपीठावर दिसणार असल्याची माहिती आहे.
आज २६ ऑक्टोबर रोजी मंगळवेढा येथे होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पान २ वर

## उसाच्या भाववाढीवरुन संघर्ष पेटला

# यशवंत अॅग्रोच्या गव्हाणीत उड्या टाकत आंदोलन



माजलगाव दि.२५ (प्रतिनिधी):- तालुक्यातील वाघोरा येथील यशवंत अॅग्रो प्रा.लि. व उस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये उस दरवाढीवरून संघर्ष निर्माण झाला असुन दि.२५ ऑक्टोबर शनिवारी उसाला दर वाढवुन द्या या मागणीसाठी कारखान्याच्या गव्हाणीत उड्या टाकत शेतकऱ्यांनी आंदोलन केले. यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी मोळी बंद केली. या प्रकारामुळे काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. संतप्त शेतकरी गव्हाणीतच ठिय्या मांडून बसले होते.
चालु हंगामाचा उस दर ३१०० रूपये जाहिर करावा, कारखाना कार्यक्षेत्रातीलच उसाला प्रमुख प्राधान्य द्यावे, कारखान्यातील केमीकल युक्त सांडपाण्याचं शेतकऱ्यांच्या ओढ्यात न सोडता प्रक्रिया व्यवस्थापन करावे, उसाचे बिल पंधरा दिवसाच्या आत द्यावे, कारखान्यातील कर्मचारी यांना सेफ्टी कॅप व शुज घालुनच गेटमध्ये प्रवेश द्यावा यासह विवीध पान २ वर

## माजलगावात महिलेच्या गळ्यातील ३ लाखांचे दागिने धूम स्टाईलने लंपास केले

माजलगाव दि.२५ (प्रतिनिधी):- शहरातील सिध्दिविनायक गणपतीची आरती करून घरी परतणाऱ्या महिलेच्या गळ्यातील तब्बल साडेतीन लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना बुधवारी (दि.२२) सायंकाळी साडेआठच्या सुमारास घडली. दरम्यान गेल्या काही दिवसांत चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने माजलगाव शहर पोलिसांचा वचक राहिला नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरु आहे.

**आठवडी बाजारातून मोबाईल, मोटरसायकलसह बस स्थानक परिसरातून महिलांचे दागिने चोरीच्या घटना वाढल्या**

शहरातील ललिता मेहता या आपल्या सुने समवेत सिध्दिविनायक गणपती मंदिरात आरतीसाठी गेल्या होत्या. आरती आटोपून दोघी घरी परतत असताना जोशी हॉस्पिटलच्या कॉर्नरजवळ दोन दुचाकीस्वार त्यांच्या समोरून गेल्या. काही अंतरावर जाऊन त्यांनी पुन्हा पाठीमागे वळून येत ललिता मेहता यांच्या गळ्यातील दागिने हिसकावले आणि दुचाकीवरु पसार झाले. ललिता मेहता यांच्या गळ्यातील जुनी बोरमाळ सुमारे अडीच तोळ्यांची असून तिची किंमत अंदाजे १ लाख २५ हजार रुपये आहे, तर मनी मंगळसूत्र साडेचार तोळे वजनाचे असून त्याची किंमत पान २ वर

## ना.पंकजाताई कवडगावमध्ये पोहोचताच नातेवाईकांनी हंबरडा फोडला

वडवणी दि.२५ (प्रतिनिधी):- डॉ.संपदा मुंडे यांनी फलटण येथे आत्महत्या केल्यानंतर आज नंतर पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी कवडगाव येथे भेट देऊन मुंडे परिवारांचे सांत्वन केले. पंकजाताई कवडगाव मध्ये येताच मयत डॉ.संपदा मुंडेंच्या परिवाराने हंबरडा फोडला, यावेळी पंकजाताई माध्यमांशी बोलताना म्हणाले की, संपादा ही धाडसी व्यक्तिमत्त्वाची मुलगी होती, ती चुकीचे सिस्टम विरुद्ध आवाज उठवत होती, वैद्यकीय क्षेत्रात काम करत असताना तिने कधी चुकीचे काम केले नाही, तिला जे मान्य नाही ते तिने कधी केलेच नाही, तिच्या आत्महत्यामागे पोलीस प्रशासन सह वैद्यकीय क्षेत्रातील काही लोकांची नावे समोर येत आहेत, या सर्वांची सखोल चौकशी झाली पाहिजे, ती



माझ्या जिल्ह्यातली नाही तर ती महाराष्ट्राची लेक आहे,व महाराष्ट्राच्या लेकीला न्याय मिळाला पाहिजे, तिच्या आई-वडिलांची परिस्थिती हालाखीची आहे, अशा परिस्थितीत त्यांनी मुलीचे वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले, संपदा ही मुलगी मुळातच हुशार पान २ वर




## कु.स्वाती वाहुळेची पी.एच.डी.साठी जपान विद्यापीठात निवड

बीड दि.२५ (प्रतिनिधी):- येथील सेवानिवृत्त कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक साहेबराव गणपतराव वाहुळे यांची कन्या कु.स्वाती हिची



पी.एच.डी.साठी कोमात्सु विद्यापीठ ईसीकावा जपान येथे निवड झाली असून लवकरच ती जपानला जाणार आहे. स्वातीच्या संशोधनाचा विषय हाऊ टू कॅलीमनेट वेस्ट प्लास्टीक हा असून पुढील संशोधन तिचे या विषयावर होणार आहे.
कु.स्वातीचे संभाजी प्राथमिक विद्यालय बीड येथे प्राथमिक शिक्षण झाले, त्यानंतर शिवाजी विद्यालय, बलभीम महाविद्यालय आणि त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर येथे तिने नॅनो टेक्नॉलाजी विषयात एम.एस्सी पूर्ण केले असून याच विषयात ती पुढील संशोधन करणार पान २ वर

## महायुती होईल किंवा नाही होईल परंतु माजलगाव न.प.वर भगवा फडकवा

- अशोक पटवर्धन, बापूसाहेब मोरे, अनिल जगताप यांचे आवाहन
- माजलगावात शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न

माजलगाव दि.२५ (प्रतिनिधी):- होउ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत माजलगाव नगर परिषद निवडणुकीत महायुती होईल किंवा नाही होईल परंतु नगर परिषदेवर उपमुख्यमंत्री पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांचे नेतृत्वाखाली भगवा फडकविण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे असे आवाहन शिवसेनेचे मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, संपर्क प्रमुख बापुसाहेब मोरे, जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी केले आहे. पान २ वर



**पाहीजे**
**अनुभवी ड्रायव्हर पाहिजे**
**मॅनेजर व वेटर पाहिजे**
:: संपर्क ::
हॉटेल जय महाराष्ट्र, बीड.
– संपर्क क्रमांक –
8975774999
वेळ : 11 ते 4

## डॉ.प्रमोद शिंदे यांच्या सह्याद्री ऑर्थोकेअर हॉस्पिटलचा थाटात शुभारंभ

बीड दि.२५ (प्रतिनिधी):- सह्याद्री ऑर्थोकेअर हॉस्पिटल व निरामय आयुर्वेद चिकित्सालय रुग्णालयाचा स्थलांतर व नवीन वास्तूत शुभारंभ सोहळा दि. २२ ऑक्टोबर बुधवार रोजी संपन्न झाला. डॉ. प्रमोद शिंदे व डॉ.सुषमा प्रमोद शिंदे यांच्या या रुग्णालयाच्या उद्घाटनासाठी माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित, नाशिक येथील प्रसिद्ध आस्थरोग तज्ञ डॉ.विजय काकतकर, डॉ.राकेश कनोजिया ,आ.विजयराजे पंडित, डॉ.अशोक थोरात, पप्पू कागदे उपस्थित होते. या प्रसंगी महंत शिवाजी महाराज, माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या शुभ आशीर्वाद लाभले. डॉ.प्रमोद शिंदे यांनी मागील आपल्या वैद्यकीय सेवेचा लेखाजोखा मांडला तसेच रुग्णालयातील



अत्याधुनिक मशीनची माहिती दिली. मान्यवरांनी बोलताना डॉ. प्रमोद शिंदे यांच्या प्रामाणिक वैद्यकीय सेवेचे पान २ वर

## डॉ.संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणाचा तपास विशेष तपास यंत्रणेद्वारे व्हावा

### न्याय मिळण्यासाठी मुंडे कुटुंबियांच्या पाठीशी –आ.सुरेश धस

आष्टी दि.२५ (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यातील कोठरबन येथील अल्पभूधारक शेतकरी असणाऱ्या मुंडे कुटुंबीयांनी कष्ट करून पोटाला चिमटे घेऊन मुलीला डॉक्टर केले. त्या डॉक्टर संपदा मुंडे यांना आत्महत्या करावी लागली, या प्रकरणातील संशयित आरोपी पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदने, संपदाच्या घरमालकाचा मुलगा बनकर, तिच्यावर दबाव आणणारे तथाकथित खासदार, त्यांचा पी.ए. आणि तक्रारीची दखल न घेणारे उपजिल्हा रुग्णालयाचे अधिकारी या सर्वांची कसून चौकशी करण्यात यावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली आहे. पान २ वर



CMYK

# बिंदुसरा नदी पात्रात ३ महिन्याच्या मुलीचा मृतदेह आढळला

## पोलिसांकडून कसून तपास, सर्व फुटेज तपासणार



बीड दि.२५ (प्रतिनिधी):- शहरातील खासबाग पुलाजवळील बिंदुसरा नदी पात्रात शनिवारी दुपारी तीन ते चार महिन्याच्या मुलीचा मृतदेह आढळून आला आहे. तीन ते चार दिवसांपुर्वी तिला नदीपात्रात टाकले असावे असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात असून मासेंनी तिच्या शरिराचे लचके तोडल्याचे दिसुन येत आहे. या प्रकारामुळे बीडमध्ये पुन्हा एकदा खळबळ उडाली असून एवढ्या मोठ्या प्रमाणात जनजागृती करून आणि बेटी बचाओचा नारा देऊनही बीडमध्ये मात्र ती अजूनही नकोशीच असल्याचे या प्रकरणावरून समोर आल्याने संताप व्यक्त होत आहे.

बीड शहरातील खासबाग जवळील बिंदुसरा नदी पात्रात तीन ते चार महिने वयाच्या मुलीचा मृतदेह आढळून आला आहे. मुलीच्या अंगात गुलाबी रंगाचा फ्रॉक असून हातात काळ्या पिवळ्या मन्याच्या मनगट्या आहेत. एवढे गोंडस बाळ पाण्यात कसे आले ? त्याला कोणी आणून टाकले की आणखी काही प्रकार आहे ? याचा तपास पोलीस करत आहेत. घटनास्थळी शहर ठाण्याचे एपीआय राठोड यांच्यासह कर्मचाऱ्यांनी भेट दिली असून मुलीचा मृतदेह ताब्यात घेऊन तपासणीसाठी जिल्हा रूग्णालयातील शवविच्छेदन गृहात आणण्यात आला आहे. दरम्यान सदरील मुलीला तीन ते चार दिवसांपुर्वी पाण्यात टाकले असावे असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मुलीला नेमके कोणी आणि कोणत्या परिस्थितीत पाण्यात आणून टाकले ? आणि का ? याचा तपास सुरू असून पोलीस त्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणार आहेत. मुलीला बिंदुसरा नदीवरील मोठ्या पुलावरून पाण्यात टाकले की ? नदीत उतरून ठेवण्यात आले ? हे आता तपासानंतरच समोर येईल.

### डॉ.संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणी

## मुंडे परिवाराचे आ.सोळंके व बाबुराव पोटभरे यांनी केले सांत्वन



वडवणी दि.२५ (प्रतिनिधी):- वडवणी तालुक्यातील कोठारबन येथील रहिवासी श्रीकृष्ण मुंडे यांची मुलगी डॉ.संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणी कवडगाव येथे आ. प्रकाशदादा सोळंके व बहुजन विकास मोर्च्याचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन करत धीर दिला व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यामार्फत एसआयटी चौकशी करण्याची मुख्यमंत्र्यांकडे मागणी करत असल्याचे सांगितले. तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेल्या लेकीचा मृत्यू झाल्याने मुंडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. नातेवाईकांच्या मागणीप्रमाणे डॉक्टर संपदाच्या भावाला शासकीय नोकरीत शिक्षणाप्रमाणे नियुक्ती देण्याबाबतही आजच मुख्यमंत्री यांना पत्राद्वारे विनंती करणार असल्याची त्यांनी सांगितले. तसेच आरोपीवर कठोर कार्यावाही करुन फाशीची शिक्षा झाली तरच संपदाला खऱ्या अर्थाने न्याय मिळेल, लोकप्रतिनिधी म्हणून त्यांना न्याय मिळेपर्यंत मुंडे कुटुंबासोबत उभा राहणार असल्याचा विश्वास त्यांनी दिला आहे, तसेच बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे म्हणाले की एक अत्यंत हुशार व बुद्धिमान डॉक्टर महिलेचा चौफेर छळ करण्यात आला. या अत्याचाराचे पाळेमुळे खोलवर रुजले आहेत, पाळेमुळे कितीही खोल गेले असले तरी मी सर्व उखडून काढल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. कोठारबन येथील प्रत्येक ग्रामस्थ हा माझ्यावर वैयक्तिक प्रेम करणारा आहे, त्यांच्या दुःखात मी सहभागी असून मयत संपदाला न्याय मिळाल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही, असा विश्वास त्यांनी नातेवाईकांना दिला.

## विनोदी ज्येष्ठ अभिनेते सतीश शहा यांचे निधन

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी):- चार दशकांहून अधिक काळ आपल्या अप्रतिम अभिनय आणि विनोदी शैलीने प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारे ज्येष्ठ अभिनेते सतीश शहा यांचे दि.२५ ऑक्टोबर रोजी निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते. गेल्या काही काळापासून ते किडनीच्या आजाराने त्रस्त होते. उपचारासाठी त्यांना मुंबईतील हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र आज दुपारी अडीचच्या सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाची बातमी कुटुंबीयांनी दिली असून अंत्यसंस्कार आज (दि.२६) पार पडणार असल्याची माहिती आहे.



पान ६ वरून

### पोलिसांनी केला हायवासह जेसीबी जप्त

पाण्याचे टाकीच्या बाजुस माजलगाव येथे जेसीबी व हायवा टिपरच्या सहाय्याने अवैध मुरुम उपसा चालु आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळालेवरुन श्री शैलेश सुधाकर गायकवाड यांनी बातमीच्या अनुषंगाने कायदेशरी कारवाई करण्याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, माजलगाव येथे कार्यरत असलेले पो.ह.१६८५ ए.ए.नामदास आणी पो.ह.१६४० ए.एस.देशमुख यांना आदेशीत केल्याने नमुद कर्मचारी यांनी सदर बातमीच्या ठिकाणी ००.०१ वाजण्याचे सुमारास अचानक छापा मारला असता सदर ठिकाणी गउइ क्रमांक चक-४४-ड-३६१९ व टाटा हायवा क्रमांक चक-४६--ठ-४३५९ सहाय्याने माजलगाव डॅम मधील मुरुमाची अवैधरित्या उपसा करताना हायवा चालक याने हायवातील मुरुम खाली करुन व गउइ चा चालक यांनी वाहने जागेवर सोडुन पळुन गेले. सदरची माहीती मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री गायकवाड साहेब यांना देवुन त्यांच्या मार्गदर्शनाखाली नमुद दोन्ही वाहने एकुण मुद्देमाल किंमती ४०,००,००० रु.चा मुद्देमाल ताब्यात घेवुन पो.स्टे. माजलगाव शहर येथे नमुद वाहनाचे अज्ञात चालक व मालक यांच्यावर गुरन ३८२/२५ कलम ३०३(२), ३(५) इछड प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### माजलगावच्या न.प.निवडणुकीत

लढाईपूर्वीच तलवान म्यान करण्याची वेळ आली आहे. एवढेच नाही, तर अनेकांनी माजल -गाव शहरात आणि वार्डात केलेली पेरणी वाया जाऊ नये म्हणून आरक्षणामुळे सौभाग्यवतींच्या उमेदवारीची तयारी केली आहे.

### बाबुराव शिंदे यांचे निधन

वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पश्चात पत्नी,मुलगा, आणि नातवंडे असा परिवार आसुन शिंदे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळल्याने पंचक्रोशीतील हळहळ व्यक्त केली जात आहे.

### जिल्ह्यात जोरदार पावसाचा इशारा

जाधव यांनी आवाहन केले आहे. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी गावस्तरावर आपत्कालीन पथके २४ ७ सज्ज असल्याचे म्हटले आहे.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रशांत वाघमारे यांनी धोकादायक इमारती , पुरग्रस्त किंवा भूस्खलन प्रवण भागात जाणे टाळण्याचे आणि कोणत्याही आपत्तीत जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे .दरम्यान पावसामुळे पिकांवर रोग - किडीचा प्रादुर्भाव वाढू शकतो . म्हणून पिकांची नियमित पाहणी करणे , कापूस व सोयाबीनचे वाळवण त्वरीत करणे , ज्वारी व हरभऱ्यात पाणी साचू न देणे , जनावरांना भिजका चारा न देणे आणि त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे आवश्यक आहे . प्रशासनाने सतत हवामान अपडेट्सवर लक्ष ठेवण्याचे आणि सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे नागरिकांना आवाहन केले असून निसर्गासमवेत शहाणपणाने वागून सुरक्षित राहा असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### मोगरा येथील गोदाकाठच्या बाधित शेतकऱ्यांच्या

तालुक्यातील मोगरा गावात खडकीपासुन ते उमेश मोगरेकर यांच्या शेतापर्यंत गोदावरी नदीच्या बॅकवॉटरचा जबर फटका शेतक-यांच्या शेती व उभ्या पिकाला बसला असुन या सर्व शेतक-यांच्या उभ्या पिकांमध्ये आठ दिवस पाच फुट उंचीपर्यंत पाणी राहिल्यामुळे कापुस व सोयाबीनचा हाता - तोंडाशी आलेला घास पुर्णतः नासल्याने या शेतक-यांचे कंबरडे मोडले आहे. वास्तविक पाहता या शेतक-यांची उभी पिके वाया गेली परंतु शेत निट करण्यासाठी मात्र पुन्हा पदरून पैसे घालावे लागले आहेत. कापुस सोयाबीनसाठी एकरी दहा ते बारा हजार रूपये खर्च झाला असुन उत्पादन मात्र हजार ते पंधराशे रूपयांपर्यंत झाल्यामुळे शेतक-यांवर मोठे आर्थिक संकट ओढावले आहे. या बाधित शेतक-यांसाठी माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके, उपजिल्हाधिकारी गौरव इंगोले, तहसिलदार संतोष रूईकर यांनी एक वेगळी बैठक घेवुन शासनदरबारी या शेतक-यांच्या व्यथा मांडुन आवाज उठवावा व या शेतक-यांना वेगळी मदत करण्यासाठी तात्काळ पंचनामे करण्याच्या सुचना महसुल कर्मचा-यांना द्याव्यात अशी मागणी मोगरा गावातील सर्व बाधित शेतकरी करत आहेत.

### लोकसंसद जन प्रेरणा शिखर पुरस्काराने

फाउंडेशन यांच्या वतीने मुंबई येथे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा लोकसंसद जन प्रेरणा शिखर सन्मानाने राज्यस्तरावर २८ ऑक्टोबर रोजी मान्यवरांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाणचे सभागृह मुंबई येथे गौरव करण्यात येणार आहे .यामध्ये धारूर येथील वैद्यकीय व्यावसायिक प्रल्हाद मुंडे पत्रकारीता व शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे अनिल महाजन व आदर्श गाव आवरगावचे सरपंच अमोल जगताप यांचा गौरव करण्यात येणार असून या कार्यक्रमास राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार विविध मंत्री, विविध मान्यवर व सिने कलावंत उपस्थित राहणार आहेत ,या तिघांचा गौरव होणार असल्यामुळे सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे व त्यांचे अभिनंदन केले जात आहे यांना पुरस्कार त्यांच्या कार्याला प्रोत्साहन मिळावे यासाठी या संस्थेच्या वतीने देण्यात आल्याचे या संस्थेचे प्रमुख सुरेश यादव यांनी सांगितले.

### दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची राज्य शासनाकडून क्रूरचेष्टा–कॉ.नागरगोजे

मध्येरात्रीच्या ढगफुटी सदृश्य अतीमुसळधार पावसाने शेतकऱ्याच्या जमीनीसहीत उभी पिके वाहून गेली, अनेक शेतकऱ्यांची जनावरे सुद्धा पाण्यात वाहून गेली, तिन शेतकऱ्यांना मृत्यु झाला एवढेच नाही तर गेल्या आठ महिन्यात राज्यातील १२८८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन त्यातील बीड जिल्ह्यातील सर्वाधिक जास्त आत्महत्या आहेत. त्यातलीत्यात वाढत्या कर्जाच्या बोजामुळे बीड जवळ असलेल्या पांगर बावडी येथील ६५ वर्षे वयाच्या शेतकऱ्याने कालच्या रविवारी म्हणजे २१ सप्टेंबर २०२५ रोजी आत्महत्या केली.शेतकऱ्यांचे १००% पिकाचे नुकसान झालेले आहे. घराच्या मोठ्या प्रमाणात पडझरी होऊन लोकांच्या घरामध्ये पाण्याचे पाणी शिरून नागरिकांचे पण मोठे नुकसान झाले शेतकऱ्याची पिकासहीत जमीनी बाहुन गेल्या, गावेचीगावे ओस पडले असुन कधी नव्हे तो पुराचे पाणी पाटोदा शहरात घुसल्याने मोठ्या प्रमाणात व्यापाऱ्याचे व शेतकऱ्याचे नुकसान होऊन व्यापारी उध्वस्त झालेले आहेत. मात्र बीड जिल्ह्याच्या शेतकऱ्यांना राज्य शासनाने विशेष पॅकेज देण्याची फक्त पोकळ घोषणा केली तुटपुंजी शेतकऱ्यांना मदत देऊन शेतकऱ्यांची क्रूर चेष्टा केली.तरी शासनाने जास्तीचा वेळ न धावता बीड जिल्हा ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ५० हजार नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे याप्रसंगी कॉ. महादेव नागरगोजे,कॉ. भगवान जावळे,कॉ. बबन औटे, राजेंद्र जायभाय,चक्रपाणी जाधव,कॉ.महादेव पवळ,वसंत लोढे, आशोक जाधव,पांडुरंग दगडखेर आदी उपस्थित होते.

### जैतापूरच्या सरपंचाची गोरगरिबांना

सात वर्षांपासून जैतापूर ग्रामपंचायत हद्दीतील जैतापूर,देवठाणा, शेरी तांडा,सजगनी तांडा, नागझरी तांडा या भागातील गोरगरीब, निराधार व दिव्यांग ग्रामस्थांना प्रतिवर्षी दिवाळीच्या औचित्याने दिवाळी फराळ वाटप करतात. जैतापूर ग्रामपंचायत हद्दीतील बहुतांश भाग हा ऊसतोड मजुरांचा परिसर आहे. या भागातील ऊसतोड मजूर ऊसतोडी ला गेल्यानंतर घरातील वयोवृद्ध निराधार व दिव्यांग नागरिकांना दिवाळीचा फराळ सहसा मिळत नाही याच अनुषंगाने आपण सण साजरा करत असताना आपल्या गाव हद्दीतील ग्रामस्थांनी आनंदापासून वंचित राहू नये याकरिता आम्ही हा उपक्रम राबवत असल्याबाबत छाया भागवत दराडे यांनी माध्यमांना सांगितले. गावातील शालेय विद्यार्थ्यांना फटाके, कपडे, शालेय साहित्य दिवाळीच्या औचित्याने करण्यात येते.या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

### डॉ.संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणी

केल्याचा गंभीर आरोप आहे. आत्महत्येपूर्वी त्यांनी आपल्या तळहातावर आत्महत्येचे कारण लिहिले होते, तसेच घरच्यांना शवविच्छेदन अहवाल बदलण्यासाठी दबाव आणला जातो असे सांगितले होते. त्यांनी यासंदर्भात उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दिली होती, मात्र वेळेत कारवाई न झाल्याने ही दुर्दैवी घटना घडल्याचा आरोप करण्यात आला आहे.मुंडे कुटुंबियांनीही बीड जिल्ह्याची मुलगी असल्यामुळे तिच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात आले असा गंभीर आरोप केला आहे.या प्रकरणाची एसआयटीमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी.आत्महत्येस जबाबदार असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांवर व अन्य दोषींवर कठोर कारवाई करावी. तसेच शवविच्छेदन अहवालात हस्तक्षेप करणाऱ्यांवरही गुन्हे दाखल करण्यात यावेत. अशा मागण्या करण्यात आल्या यावेळी रिपाई जिल्हा उपाध्यक्ष बापुराव पवार,माजी सभापती काकासाहेब जोगदंड, श्रीमंत सोनावणे पांडुरंग, शिवसंग्राम नेते पांडुरंग आवारे, कल्याण महाराज जगताप, प्रदेशाध्यक्ष छत्रपती राजेशाहु महाराज विचारमंच विवेक कुचेकर,प्रा.आबासाहेब जाधव,बळीराम राऊत,मुस्तफा पठाण,आजिनाथ सोनावणे, सोहेल पठाण, प्रमोद नाईकवाडे, संतोष बोरखेडे, आत्माराम नाईकवाडे, उत्तम जाधव, लिंबाजी तांदळे , पत्रकार एन टी.वाघमारे, विकास नाईकवाडे , चौसाळा पोलिस ठाण्याचे सचिन मुरूमकर,सचिन गर्जे उपस्थित होते. या सर्वांनी आंदोलनात सहभागी होऊन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

### शरद काळे यांची नियुक्ती

राष्ट्रवादी काँग्रेसचे अंबाजोगाई शहराध्यक्ष महादेव आदमाणे यांच्या उपस्थितीमध्ये शुक्रवार दि.२४ रोजी देण्यात आले. यावेळी किशोर परदेशी, अमोल लोमटे,दिनेश भराडीया, कचरू सारडा, सुशील वाघमारे, शेख मुक्तार, अंकुश हेडे , मतीनं जरगर यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.शरद काळे यांना दिलेल्या नियुक्ती पत्रात नमूद केले आहे की आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचारधारेवर दृढ श्रद्धा ठेवून पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहात. शिव-शाहू-फुले-आंबेडकर व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांचे विचार व पक्षाची विचारधारासर्वत्र पोहोचवण्यासाठी, डिजिटल माध्यमांवरील उपस्थिती वाढविणे, युवकांना जोडणे तसेच समाज माध्यमांमध्ये पक्षाची धोरणे व कार्यक्रम हे सामन्य जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या हेतून आपण काम करत आहात. आपल्या या कार्यास आणखीन पाठबळ मिळण्यासाठी आपली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सोशल मीडिया सेलचे प्रदेशाध्यक्ष आनंदजी पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राजेश्वर (आबा) चव्हाण यांच्या मान्यतेने माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या शिफारशीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अंबाजोगाई सोशल मीडिया तालुका अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात येत असल्याचे नमूद केले.

### सामाजिक न्यायमंत्री शिरसाठ यांच्याकडून

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते व राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांनी छत्रपती संभाजी नगर येथून बीडला येऊन आज गुरुवारी (दि.२४) जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांची भेट घेतली. तसेच त्यांनी डॉक्टरांकडून उपचारांची माहिती घेत मुळूक यांची प्रकृती लवकरात लवकर सुधारावी अशी ईश्वरचरणी प्रार्थना व्यक्त केली.मंत्री शिरसाठ म्हणाले की तुमच्यासारख्या लढवू, हसतमुख आणि कार्यकर्त्यांची शिवसेनेला आजही गरज आहे. तुम्ही लवकर बरे व्हा आणि पुन्हा जोमाने पक्ष कार्य सुरू करा. शिवसेना कायम तुमच्या पाठीशी आहे अशा शब्दांत त्यांनी मनापासून मुळूक यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अनिल जगताप, शिवसैनिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकदिलाने सचिन मुळूक यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी अशी कामना व्यक्त केली.

### महादेव नन्नवरे यांचे निधन

गावातील सामाजिक आणि धार्मिक उपक्रमात त्यांचा नेहमी सहभाग असे. त्यांनी आपल्या वागणुकीतून सर्वांशी आपुलकीचे नाते निर्माण केले होते. त्यामुळे त्यांचा मोठा स्नेहवर्तुळ तयार झाला होता. त्यांच्यावर आर्वी येथे शनिवारी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी नातेवाईक, ग्रामस्थ, सामाजिक, राजकीय, पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांच्या पश्चात चार भाऊ, एक बहीण, दोन मुले, एक मुलगी, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते शिरूरकासार मराठी पत्रकार परिषद तालुका अध्यक्ष जालिंदर नन्नवरे यांचे वडील होत.त्यांच्या निधनाने नन्नवरे कुटुंबावर शोककळा पसरली असून सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात येत आहे.

### निष्ठा,प्रामाणिकपणा व कर्तृत्ववान सेवेमुळे जे.आर.पवार

वृद्धेश्वरच्या आस्थापनेतून निवृत्त होत आहेत असेही ते म्हणाले. यावेळी बोलताना आमदार मोनिकाताई राजळे यांनी त्यांच्या प्रदीर्घ सेवेचे कौतुक करून, त्यांच्या कामाची प्रशंसा केली. कारखान्याच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी त्यांनी दिलेले योगदान अनुकरणीय आहे असेही त्या म्हणाल्या. त्यांच्या समर्पित कार्यामुळे संस्था नेहमीच पुढे वाटचाल करीत राहील आणि श्री जे .आर. पवार साहेब यांच्या पुढील आयुष्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

शुक्रवार दि २४ ऑक्टोबर २०२५ रोजी वृद्धेश्वर साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व आस्थापनेचे कार्यकारी सल्लागार जे. आर .पवार यांचा सेवा निवृत्ती सोहळा तसेच शंकरराव रामचंद्र पवार या त्यांच्या थोरल्या बंधूचा शताब्दी महोत्सव सोहळा आणि श्रीमती ताराबाई हरिभाऊ पवार या त्यांच्या वहिनीचा अमृत महोत्सव सोहळा अशा तीन कार्यक्रमाचे आयोजन यावेळी करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार साहेबराव दरेकर हे होते. यावेळी बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आष्टी तालुक्यातील बंद अवस्थेतील कडा सहकारी साखर कारखाना यशस्वीपणे चालू करण्यासाठी सल्लागार म्हणून जे. आर .पवार यांनी सेवा द्यावी असा आग्रह बोलून दाखविला. राजकारणाचे जोडे बाहेर ठेवून सहकार्य करण्याचा मनोदय यावेळी जे. आर. पवार साहेब यांनी व्यक्त केला.

यावेळी पद्मश्री पोपटराव पवार ,आमदार सुरेश धस, माजी आमदार भीमराव धोंडे ,माजी आमदार बाळासाहेब आजबे ,माजी कुलगुरू सर्जेराव निमसे, राष्ट्रीय काँग्रेसचे राज्य प्रवक्ते दादासाहेब मुंडे ,युवा नेते सागर धस ,श्रीमती सुशीला ताई मोराळे यांची समायोचित भाषणे झाली. यावेळी वृद्धेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन व सर्व संचालक मंडळ तसेच दादा पाटील राजळे महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक वर्ग मराठा सेवा संघाचे तालुका अध्यक्ष इंजि.तानाजी बापू जंजिरे व सर्व कार्यकारिणी सदस्य, ज्येष्ठ पत्रकार ड सीताराम पोकळे, पत्रकार अविनाश कदम, पत्रकार प्रविण पोकळे, पत्रकार सचिन रानडे, पत्रकार संतोष सानप, पत्रकार शरद तळेकर,पत्रकार समीर शेख,अक्षय विधाते,सोपान पगारे,युवा नेते प्रदीप थोरवे, सरपंच सावता ससाने, सरपंच संजय विधाते ,ह भ प राऊत महाराज ,ह भ प कराळे माऊली महाराज ,आरपीआयचे अध्यक्ष अशोक साळवे ,किसान सभेचे बबन आवटे ,डॉ. मधुकर हंबर्डे ,चीफ इंजिनिअर संदीपपान जाधव ,निवृत्त कार्यकारी संचालक हरिभाऊ मार्कंडे, सुखलाल मुथा, पं. स. माजी सदस्य संजय धायगुडे , कॅप्टन सहस्त्रबुद्धे,माजी सरपंच चंद्रकांत साके,पप्पू गवळी, मल्हार सेनेचे युवराज खटके ,समाजसेवक प्रा. दादा विधाते, आम आदमी पार्टीचे तालुकाध्यक्ष सुहास चौधरी आणि बीड व अहिल्यानगर जिल्ह्यातील पवार साहेबावर प्रेम करणारे मान्यवर ,नातेवाईक व मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य टेमकर सर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालक श्रीमती विना दिघे यांनी केले .शेवटी सर्व उपस्थितांचे आभार युवा नेते प्रदीप थोरवे यांनी मानले.

पान १ वरून

### गडकरी म्हणाले, अन्यथा वेगाने आपटू

भाजप कार्यकर्त्यांची व्यथा, अस्वस्थता, नाराजी गडकरी यांनी मांडली असून याची दखल घेण्याची मागणी केली जात आहे. विशेष म्हणजे आशिष देशमुख हे भाजपचे आमदार होते. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरच तोफ डागली होती. मध्येच पक्ष सोडला. त्यानंतर ते काँग्रेसमध्ये दाखल झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधातही निवडणूक लढले. पराभव झाल्यानंतर पुन्हा भाजपमध्ये दाखल झाले. त्यांना लगेच उमेदवारीसुद्धा देण्यात आल्याने भाजपमध्ये अद्यापही नाराजी कायम आहे.

### यशवंत ॲग्रोच्या गव्हाणीत आंदोलन

मागण्यांसाठी शनिवारी तालुक्यातील वाघोरा येथील यशवंत ॲग्रो प्रा.लि. या कारखान्यावर उस उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलन केले. दरम्यान कारखाना प्रशासन उसाला अत्यल्प दर देत असल्याने मोळी टाकुन गाळप शुभारंभ करण्याच्या दिवशी शेतक-यांनी यशवंत ॲग्रो प्रा. लि. या कारखान्याच्या गव्हाणीत उड्या टाकुन आंदोलन केले.

### दामिनी पथकाची कॉफी शॉपवर कारवाई

कलम ११०/११७ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच जानेवारी २०२५ ते आज पावेतो विविध कॉफी शॉपवर एकूण ८४ प्रतिबंधात्मक केसेस करण्यात आलेल्या आहेत. तसेच शाळा, कॉलेज, क्लासेस व हॉस्टेलच्या बाहेर उभे राहून मुलींना त्रास देणाऱ्या इतर रोडरोमियोंवरही या अधिनियमानव्ये केसेस करण्यात आलेल्या आहे. अशा एकूण १६८ नुसार प्रतिबंधात्मक कारवाया मुंबई पोलीस अधिनियम कलम ११०/११७ नुसार कारवाई करण्यात आल्या आहेत.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय पल्लवी जाधव, सहायक फौजदार मीरा रेडेकर , पोलीस हवालदार शोभा जाधव व पोलीस हवालदार अशोक शिंदे, पोलीस शिपाई उर्मिला म्हस्के सर्व नेमणूक दामिनी पथक बीड यांनी केली.

### ना.पंकजाताई कवडगावमध्ये पोहोचताच...

होती ,आपण स्वतः महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी यांची मंगळवारी भेट घेऊन त्यांना या संदर्भात सविस्तर निवेदन देणार असून या संपूर्ण प्रकरणात जे- जे लोक सहभागी आहेत त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे, ही केस स्पेशल इन्वेस्टीगेशन कडे सोपवत तात्काळ या प्रकरणाचा छडा लावत मयत संपदा मुंडेंना न्याय देण्यासाठी आपण प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याच्या त्या म्हणाले.

### कु.स्वाती वाहुळेची जपान विद्यापीठात निवड

आहे. तिच्या यशाबद्दल तिचे मामा सचिन लहाने, बहीण रोहिणी, पांडुरंग फाटक, राजेंद्र माने तसेच नातेवाईक, मित्र परिवार यांनी अभिनंदन केले आहे. स्वातीने तिच्या यशाचे श्रेय तिची आई बुद्धवासी कुसुम वाहुळे व बहीण रोहिणी वाहुळे यांना दिले आहे. स्वातीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### माजलगावात महिलेच्या गळ्यातील ३ लाखाचे दागिने लंपास

सुमारे २ लाख २५ हजार रुपये आहे. अशा प्रकारे चोरट्यांनी तब्बल साडेतीन लाख रुपयांच्या सोन्याचे दागिने लंपास केले. या प्रकरणी प्रकाश मेहता यांच्या फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दोन अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास शहर पोलीस करत आहेत. दरम्यान, शहरात गेल्या काही दिवसांत चोरी, लूट व घरफोड्यांच्या घटना वाढत असल्याने नागरिकांत पोलिस गस्त व सुरक्षा व्यवस्थेबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पोलिसांनी या घटनांवर लगाम घालून नागरिकांचा विश्वास परत मिळवावा, अशी मागणीही नागरिकांतून होत आहे.

### माजलगाव न.प.वर भगवा फडकवा...

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संदर्भात शिवसेनेच्या वतीने दि.२५ ऑक्टोबर रोजी दु.२.०० वाजता हॉटेल व्यंकटेश येथे शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते. या बैठकीस प्रमुख मार्गदर्शक म्हणुन मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, संपर्क प्रमुख बापुसाहेब मोरे, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर, चंद्रकांत नवले, युवा सेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख शारदा डोईजड, तालुकाप्रमुख तुकाराम येवले, शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना जिल्हाप्रमुख ह.भ.प. सर्जेराव महाराज काशिद, शहर प्रमुख पापा सोळंके उपस्थित होते. या बैठकीत दिंद्रुडचे ग्रामपंचायत सदस्य नारायण चांदबोधले, माजलगावचे युवा नेते जय सुतार, राजेश विघ्ने, सुरेश नवले यांनी आपल्या अनेक कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश घेतला. तर या बैठकीमध्ये उपतालुका प्रमुख म्हणुन महादेव सुरवसे, नारायण चांदबोधले, विधानसभा समन्वयक ॲड.महेश कुंभार, शहर संघटक म्हणुन अरविंद खंडागळे, तालुका संघटक म्हणुन राजेश विघ्ने, शहर उपप्रमुख जय सुतार, बाबा यादव, बळीराम घोलप, सतिष देवकर, दत्ता कटारे, आदित्य टाकणखार, संदेश सोनवणे, अविनाश गायकवाड, शाम पासंगे, रितेश गायकवाड, सुयोग मोताळे, सोमेश्वर धारक, आकाश पाबळे, निशीकांत पाटील, पुरूषोत्तम आंबीलवादे, गोविंद शेडुते, रामभाउ हिंगण, अनिल गाडेकर, संतोष कदम, पवन उजगरे, बाबा यादव, रामेश्वर घाटुळ, अंगद खांडेकर, दिपक चोरघडे यांचेसह शहरातील विभागप्रमुख, उपविभागप्रमुख व ग्रामीण भागातील विभागप्रमुख, उपविभागप्रमुखांना नियुक्तीपत्र देउन निवडी करण्यात आल्या. या बैठकीला विजय मौजकर, युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे, विनोद कुलथे, विकास झेटे, अनिल आवाड, रामेश्वर काशीद,अशोक डोणे, उदय नरवडे, किशोर झिंजुर्के राहुल बावणे,यांचेसह शिवसैनिक, युवासेना पदाधिकारी, महिला आघाडी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुकाराम येवले यांनी केले. सुत्रसंचालन व आभार शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके यांनी मानले.

### सह्याद्री ऑर्थोकेअर हॉस्पिटलचा शुभारंभ...

तसेच त्यांच्या संघटन कौशल्याचे कौतुक केले. आमदार विजयराजे पंडित यांनी शिवछत्र परिवार आणि शिंदे कुटुंबीयाचे मागील तीन पिढ्यापासून संबंध असल्याचे सांगून डॉ.प्रमोद शिंदे यांच्या सामाजिक कार्याचा आवर्जून उल्लेख केला व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. डॉ विजय काकतकर यांनी याप्रसंगी बोलताना डॉ.प्रमोद व डॉ. सौ सुषमा यांना शुभेच्छा दिल्या व डॉ.प्रमोद यांच्या विशेष गुणांचे कौतुक केले. आपल्या विद्यार्थ्यांची प्रगती पाहताना आनंद होत असल्याचे नमूद केल. माजी आ.राजेंद्र जगताप, डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.संजय राऊत ,शेख निझाम, शफीक भाऊ, डॉ.अशोक थोरात , डॉ.अशोक कोल्हे, डॉ.टी. एल. देशमुख, डॉ.एस.वाय. जाधव, सागर सुरेश धस , सौरव बजरंग सोनवणे, बाबूशेठ लोढा, अशोक शेठ लोढा, डॉ.राजेंद्र बंड, सर्व प्रमुख राजकीय पक्षाचे पदाधिकारी , स्नेहिजन रुग्णपरीवार, संपादक, पत्रकार बांधव आणि नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहून शिंदे दांपत्यास पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन ज्ञानदेव काशिद यांनी तर आभार प्रदर्शन सी.ए. बी.बी. जाधव साहेब यांनी केले.रात्री उशिरापर्यंत अनेक हितचिंतकांनी शुभेच्छा दिल्या.

### डॉ.संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणाचा तपास विशेष तपास यंत्रणेद्वारे व्हावा

या बाबत प्रसार माध्यमांशी बोलताना ते पुढे म्हणाले, बीड जिल्ह्यातील जनता गोरगरीब असली तरी कष्टकरी परंतु स्वाभिमानी आहे. राज्यात शैक्षणिक क्षेत्रात बीड जिल्ह्यातील मुला-मुलींनी नाव कमावले आहे मात्र डॉ.संपदा मुंडे हिला बीडची आहे असे म्हणून हिणवण्यात आले आहे, ही अत्यंत चुकीची बाब आहे. डॉ.संपदा हिला आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागले, यामागे काहीतरी गंभीर कारण असावे. आमच्या भागातील गोरगरीब लेकींचा कोणी गैरफायदा घेत असेल त्यांना जरब बसण्याची आवश्यकता आहे. यापुढे दुसरी संपदा होऊ नये यासाठी या आत्महत्या प्रकरणाचा तपास विशेष तपास यंत्रणेद्वारा करण्यात यावा आणि हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवण्यात यावा, जेणेकरून आरोपींना तात्काळ शिक्षा मिळेल. मयत डॉ.संपदा मुंडे यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी मी भक्कमपणे उभा राहणार आहे असेही आ.धस यांनी शेवटी सांगितले.

### फडणवीस–जरांगे आज एकाच व्यासपीठावर

पुतळा अनावरण सोहळ्याला या दोन्ही नेत्यांची उपस्थिती निश्चित झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वर्तुळात चर्चांना आणि तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

या भव्य सोहळ्याचे आयोजन भाजपचे पंढरपूर-मंगळवेढा आमदार समाधान अवताडे यांनी केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण होणार असून मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांनाही कार्यक्रमासाठी अधिकृत निमंत्रण देण्यात आले आहे. त्यांनी या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे मान्य केले आहे अशी माहिती त्यांनी दिली आहे. या कार्यक्रमाला राज्यातील अनेक मंत्री, खासदार, आमदार तसेच सर्व पक्षांचे नेते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचेही अवताडे यांनी सांगितले.

दै.पार्श्वभूमी,बीड Date-26/10/2025

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME OF

**OLD NAME - BAHANTOSH ZAID ASAD**

**New Name : ZAID BIN ASAD HANTOSH**

ADD :- S/O Asad Hantosh Near Raj Masjid Raj Galli Majalgaon Beed, MS- 431131

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# रणजीत बनसोडे यांच्या संपर्क कार्यालयात आ.सतीश चव्हाण यांचे केले भव्य स्वागत

बीड दि २५(प्रतिनिधी)– पदवीधर मतदारसंघाचे आ.सतीश चव्हाण यांनी नगरसेवक रणजीत बनसोडे व आरती बनसोडे यांच्या संपर्क कार्यालयास भेट दिली. यावेळी त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले.यावेळी नगरसेवक रणजीत बनसोडे यांनी आपल्या कार्यकाळातील विकासकामांचा सविस्तर अहवाल आ. सतीश चव्हाण यांना सादर केला. या कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते, प्रा. डॉ. संजीव सुरवसे, सुनील कुर्लेकर, भगवान पवार, विजय खोसे, एन. जी. डोके, अंकुश निर्मळ, नगरसेवक भैय्यासाहेब मोरे, प्रभाकर पोपळे, शामराव मुळे, आप्पासाहेब वाघ, कैलास सपकाळ, सुरेश करांडे, दिलीप सावंत, शरद जोगदंड, बप्पासाहेब देवगुडे, बिबीशन हावळे, विलास आहेर, महारुद्र शेळके, विक्रम आमटे, शिवाजी जगताप, रोहन गुजर, मस्के साहेब, बांगर साहेब, दोडके , राऊत , श्रीमती आरतीताई बनसोडे, श्रीमती मंगल कुर्लेकर आदी मान्यवर उपस्थित होते.


# पार्श्वभूमी

दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ पान -३




चिंचोली माळी – संजय घोडके यांची केंद्रीय अध्यक्ष म. मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेवर निवड झाल्याबद्दल व चिंचोली चे भूमिपुत्र चि.डॉ.आकाश बाबासाहेब राऊत,हे पंजाब कृषी विद्यापीठ लुधियाना येथे पी.एच.डी.प्राप्त करून सहायक प्राध्यापक म्हणून रुजू झाले बद्दल त्यांचा ग्रामस्थांकडून श्री संत नामदेव महाराज सभागृहात भव्य सत्कार करताना.

# जिल्हा वाहतूक शाखेकडून शहरात सुरू अतिक्रमण विरोधी मोहीम

## बसस्थानक व शिवाजी पुतळा परिसरात अतिक्रमणावर कारवाई





बीड दि २५(प्रतिनिधी)– बीड शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात सर्वच ठिकाणी रस्त्यावर अतिक्रमणे झाली असून या अतिक्रमणामुळे रहदारीला मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होऊ लागला. तसे पुन्हा एकदा जिल्हा वाहतूक शाखा आणि नगरपालिकेने अतिक्रमण विरोधात मोहीम सुरू केली. शनिवारी सुरू केलेल्या या मोहिमेत बस स्थानक परिसर व शिवाजी पुतळा परिसरात असलेले अतिक्रमण काढण्यात आले. सांगूनही अतिक्रमण काढले नसल्याने संबंधित अतिक्रमण करून मांडलेले टपरी साहित्य नगरपालिकेने उचलून नेले यामुळे पुन्हा एकदा अतिक्रमण करणारा मध्ये खळबळ उडाली आहे.

यासंदर्भात माहिती अशी की बीड शहरांमध्ये एकदा अतिक्रमण उठवले की पुन्हा पाच सहा महिने नगरपालिका किंवा पोलीस लक्ष देत नाहीत, असे समजून रस्त्या रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्यांची जणू स्पर्धा लागलेली असते. बीड बस स्थानक परिसरात, शिवाजी महाराज पुतळा परिसरात याशिवाय सुभाष रोड अशा अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. शहरात प्रत्येक नागरिकाकडे कोणते तरी वाहन आहे. लोकसंख्या इतकीच वाहने झाली आहेत. परंतु पूर्वीपासूनचे असलेले रस्ते तेवढेच आहेत. यामुळे रस्त्यावर असलेल्या वाहनांची मोठ्या संख्येने गर्दी असलेली दिसून येत असताना रस्त्याच्या दोन्ही बाजूने अतिक्रमण करून जवळपास अर्धा रस्ता व्यापण्याचे काम अतिक्रमण धारकांनी केलेले आहे. यामुळे महत्त्वाच्या आणि रहदारीच्या रस्त्यावर सतत वाहतूक ठप्प होण्याचे प्रकार घडत असताना जिल्हा वाहतूक शाखेचे सपोनि सुभाष सानप यांनी बीड नगरपालिकेला वारंवार यासंदर्भात पत्रव्यवहार केल्यानंतर नगरपालिकेने सहकार्य करत अतिक्रमण विरोधात मोहिमेला सुरुवात केली. त्यानुसार बस स्थानक परिसरात असलेल्या शिवाजी महाराज पुतळा चौक आदी ठिकाणी शनिवार रोजी बीड नगरपालिका आणि जिल्हा वाहतूक शाखेचे सपोनि सुभाष सानप व त्यांच्या टीमने अतिक्रमण विरोधात कारवाई चालवली .यामुळे अतिक्रमणधारकांच्या टपऱ्या बाकडे आदी साहित्य नगरपालिका व पोलिसांनी उचलून ताब्यात घेतले. यामुळे पुन्हा एकदा अतिक्रमण धारकात खळबळ उडाली आहे दरम्यान ही अतिक्रमण विरोधी मोहीम शहरातील प्रत्येक रस्त्यावर कायम चालू ठेवावी व रस्ते खुले करावेत अशी मागणी देखील यानिमित्ताने सुज्ञ नागरिकांमधून केली गेली सदरची कारवाई जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी सुभाष सानप, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस हवालदार आजिनाथ मुंडे, चालक पोलीस हवालदार संतोष हारके, पोलीस आमदार राहुल घाडगे, पोलीस ड्रायव्हर कदम नगरपालिका अतिक्रमण पथकाचे प्रमुख मुन्ना गायकवाड, पवन लाहोट, सुजित जाधव , राम रोकडे, विकी गागट इत्यादी नी केली.

# रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन व जिल्हा रुग्णालय यांच्याकडून पोलिओ रॅली संपन्न




बीड दि २५ (प्रतिनिधी)– जागतिक पोलिओ दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन आणि जिल्हा रुग्णालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने ''पोलिओ जनजागृती रॅली'' काढण्यात अाी. या रॅलीचा समारोप जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या कार्यक्रमास क्लब चे अध्यक्ष इंजि. राहुल बोरा, सचिव प्रा. डॉ. प्रकाश कोंका, प्रोजेक्ट चेअरमन डॉ. शिवाजी देशमाने, या सोबत पीडीजी हरीशभाई मोटवानी आणि आयएमए चे अध्यक्ष डॉ. अनंत मोरे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आर.एम.ओ. डॉ. मुजाहिद, प्राचार्य बेद्रे मॅडम, कुलथे मॅडम व गिरी मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

पीडीजी हरीशभाई मोटवानी यांनी मार्गदर्शन करताना , रोटरी इंटरनॅशनलने १९७९ साली पोलिओविरुद्ध लढ्याची सुरुवात केली आणि १९८८ मध्ये डब्ल्यूएचओ, युनिसेफ, सीएफसी, सीडीसी आणि गेट्स फाउंडेशन सोबत ''ग्लोबल पोलिओ एरॅडिकेशन इनिशिएटिव्ह'' सुरू केली. रोटरीने आतापर्यंत २.६ अब्ज डॉलर्सहून अधिक निधी दिला असून लाखो रोटेरियन स्वयंसेवक म्हणून जगभरात लसीकरण मोहिमेत सहभागी झाले. ''एपव झेश्रळे छुं'' अभियानाद्वारे जनजागृती, रॅली, निधी संकलन आणि प्रचारकार्य करण्यात आले. भारत २०१४ मध्ये पोलिओ मुक्त देश घोषित झाला, ज्यात रोटरीचे योगदान निर्णायक ठरले. रोटरीचे प्रयत्न म्हणजे मानवतेला रोगमुक्त भविष्य देण्याचे प्रेरणादायी उदाहरण आहे. असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोप करताना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांनी जिल्हा रुग्णालय बीड येथे पोलिओ उच्चाटनासाठी व्यापक लसीकरण मोहीम राबविली जाते. आरोग्य कर्मचारी, डॉक्टर आणि आशा स्वयंसेवक यांच्या समन्वयाने प्रत्येक बालकापर्यंत लस पोहोचविण्याचे नियोजन केले जाते. जनजागृती, रॅली आणि आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून पोलिओमुक्त समाजाची दिशा दिली जाते असे म्हणाले. सरदील रॅली मध्ये नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (एन. आय. एम. ए.),इंडियन डेंटल असोसिएशन (आय. डी. ए.),होमिओपॅथिक मेडिकल इंटिग्रेटेड असोसिएशन, तसेच महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन, बीड यांच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचे अध्यक्ष रो. इंजि. राहुल बोरा यांनी तर सूत्रसंचालन रो. विशाखा सूर्यवंशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन रोटरी क्लबचे सचिव प्रा. डॉ. प्रकाश कोंका यांनी केले.

## पावसात भिजणाऱ्या बेवारस व्यक्तीला पत्रकारांनी उचलून केले रुग्णालयात दाखल

बीड, दि. २४ (प्रतिनिधी)– संततधार पावसाने थैमान घातले असताना असताना या पावसाच्या माऱ्यात रस्त्यावर बेवारस अवस्थेत पडलेल्या एका व्यक्तीला पत्रकारांनी तत्परतेने रुग्णवाहिकेतून उचलून जिल्हा रुग्णालयात दाखल केले, ज्यामुळे त्याला वेळीच उपचार मिळाले.बीड शहर आणि परिसरात शुक्रवारी सुरू असलेल्या पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. यातच रस्त्याच्या कडेला थंडीने आणि पावसाने कुडकुडणारी एक बेवारस व्यक्ती आढळली. त्याची अवस्था पाहून पत्रकार अमजद खान, शेख वसीम, शेख फाईम, यांनी तातडीने रुग्णवाहिकेला पाचारण केले आणि स्वतः पुढाकार घेत त्या व्यक्तीला रुग्णालयात पोहोचवले.या घटनेची माहिती मिळताच जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय पथकाने त्या व्यक्तीवर तातडीने उपचार सुरू केले. पत्रकारांच्या या संवेदनशील कृतीमुळे त्या बेवारस व्यक्तीला केवळ जीवदानच नाही, तर माणुसकीचा उबदार आधारही मिळाला.

## नगराध्यक्ष पदासाठी संगीता वाघमारे यांच्या नावाची होतेय जोरदार चर्चा

बीड दि २५ (प्रतिनिधी) आगामी नगरपालिकेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदाचे आरक्षण अनुसूचित जातीच्या महिलांसाठी सुटल्याने, बीड शहरात आता विविध नावांची चर्चा रंगू लागली आहे. त्यात सर्वाधिक सौ. संगीता वाघमारे यांचे नाव चर्चेत पुढे आहे.

संगीता वाघमारे या गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय असून, सामान्य जनतेच्या अडचणी सोडविणे, गरजू नागरिकांना मदत करणे, तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेणे यामुळे त्या लोकांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण करण्यात यशस्वी ठरल्या आहेत. दररोज त्या जनतेच्या संपर्कात राहून त्यांच्या समस्या जाणून घेतात आणि शक्य त्या सर्व मार्गांनी त्यावर उपाययोजना करण्याचा प्रयत्न करतात. आरक्षणाची घोषणा झाल्यानंतर नागरिकांमध्ये ''संगीता वाघमारे या नगराध्यक्ष पदाच्या प्रबळ दावेदार ठरू शकतात'' अशी चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. शहरातील अनेक नागरिक, महिला गट आणि युवक त्यांना पाठिंबा देत असून ''सामान्य माणसाची नगराध्यक्षा'' म्हणून त्यांचे नाव घेतले जात आहे. स्थानिक पातळीवर विविध सामाजिक संस्था, कार्यकर्ते आणि नागरिकांचा त्यांना वाढता पाठिंबा पाहता, आगामी निवडणुकीत संगीता वाघमारे या नगराध्यक्ष पदासाठी प्रमुख दावेदार ठरतील, असा कयास व्यक्त केला जात आहे.

## ५०० महिलाच्या कलश यात्रेने सात दिवसीय श्रीमद् देवी भागवत कथेला झाली सुरुवात



अंबाजोगाई दि २५ (प्रतिनिधी)-- गुरुदेव श्री आशुतोष महाराजजी यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली दिव्य ज्योति परिवार लातूर संस्थेच्या संवर्धन (महिला सशक्तीकरण व लिंग समानता) प्रकल्पांतर्गत दि.२५ ते दि. ३१ ऑक्टोबर या कालावधीमध्ये योगेश्वरी महाविद्यालय ग्राउंड, परळी रोड,अंबाजोगाई येथे सायं. ३ ते ७ या वेळेत आयोजित केलेल्या भव्य श्रीमद्? देवी भागवत महापुराण ज्ञानयज्ञ कथेची सुरुवात शुक्रवारी रोजी सकाळी ११ वा. योगेश्वरी देवी मंदिर अंबाजोगाई येथून मंगल कलश व शोभा यात्रेने करण्यात आली. ५०० महिलांनी डोक्यावर कलश घेऊन या कलश यात्रेत सहभाग घेतला. कलश यात्रा शहरातील योगेश्वरी देवी मंदिर येथून निघून शिवाजी चौक , मीनाताई ठाकरे चौक, मोंढा मार्गे बस स्टँड मार्गे योगेश्वरी महाविद्यालय ग्राउंड या कथेच्या ठिकाणी पोहोचली. दिव्य ज्योती जागृती संस्थानतर्फे भव्य श्रीमद्? देवी भागवत कथेचे आयोजन केले जात आहे. गुरु आशुतोष महाराजजींच्या शिष्या साध्वी सुश्री आदिती भारती आपल्या सुमधुर वाणीने कथा वाचन करतील. कलश यात्रेचे उद्घाटन केज मतदार संघाच्या आ. नमिताताई मुंदडा आणि योगेश्वरी मंदिर देवस्थान ट्रस्ट सदस्य सारंग पुजारी यांनी केले. शहरात विविध ठिकाणी कलश यात्रेचे स्वागत करण्यात आले.

# बीड नाळवंडी रस्त्यासाठी १५-१६ गावे टाकणार आगामी जि.प.पं सर्कल निवडणुकीवर बहिष्कार?



बीड दि २५ (प्रतिनिधी)– बीड ते नाळवंडी रोड गेल्या १५ ते २० वर्षांपासून अत्यंत दुरवस्थेत असलेल्याबीड– नाळवंडी रस्त्याच्या प्रश्नाकडे लोकप्रतिनिधींनी सातत्याने दुर्लक्ष केल्याने, संतप्त झालेल्या १५ ते १६ गावांच्या ग्रामस्थांनी आगामी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीवर पूर्णपणे बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला असल्याचे मेलवर टाकलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे

नाळवंडी रस्ता अनेक वर्षांपासून पूर्णपणे खराब झाला आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत, ज्यामुळे ग्रामस्थांना दैनंदिन जीवनात अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात या रस्त्यावरून प्रवास करणे अत्यंत धोकादायक ठरते.आरोग्याच्या समस्या: वेळेवर रुग्णवाहिका गावात पोहोचू शकत नाही, त्यामुळे आरोग्यविषयक आपत्कालीन परिस्थितीत गंभीर परिणाम भोगावे लागले आहेत.शिक्षण आणि व्यवसाय: खराब रस्त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी तसेच शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या वाहतुकीसाठी मोठा त्रास सहन करावा लागतो. या रस्त्याच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी वेळोवेळी संबंधित ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य तसेच आमदार आणि खासदारांकडे अर्ज केले. तसेच, प्रशासकीय पातळीवरही सातत्याने पाठपुरावा केला गेला. मात्र, प्रत्येक वेळी केवळ पोकळ आश्वासने मिळाली आणि रस्त्याचे काम झाले नाही. लोकप्रतिनिधींनी या ज्वलंत प्रश्नाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याने, आता मतदारांनी आपला लोकशाही हक्क वापरण्यास नकार देण्याचा कठोर निर्णय घेतला आहे.आपल्या मागण्या मान्य होत नसल्याचे पाहून, हताश झालेल्या १५-१६ गावांतील नागरिकांनी एकत्र येऊन एक महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत सर्वानुमते आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीवर पूर्णपणे बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला.असल्याचे पत्रकात नमूद केले आहे.

## हाजी अराफात शेख यांच्या कडून वंचितांना दिवाळी भेट

बीड दि २५ (प्रतिनिधी)– हाजी अराफात शेख यांच्या मातोश्री श्रीमती शमा आलमगीर शेख यांच्या प्रेरणेने बालग्राम अनाथाश्रमातील निरागस बालकांपासून ते ऊसतोड मजुरांपर्यंत दिवाळीचा आनंद पोहोचवण्यात आला. गेवराई येथील बालग्राम अनाथाश्रम येथे राज्य मुस्लिम खाटीक समाजाच्या वतीने दिवाळी साजरी करण्यात आली. या वेळी अनाथ मुलांना नवीन कपडे, फराळ आणि फटाके वाटपसंस्थापक अध्यक्ष हाजी अराफात शेख, यांच्या हस्ते करण्यात आले

तसेच, दारुल उलूम निजामिया रझविया मदरशात विद्यार्थिनींना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. विद्यार्थिनींना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या वेळी उपस्थित सदस्यांनी विद्यार्थिनींसोबत दुवा (प्रार्थना) केली. ''शिक्षणासोबत स्वावलंबन हेच समाजाच्या प्रगतीचे मूळ आहे,'' असे हाजी अराफात शेख यांनी नमूद केले.याशिवाय, महांडुळा (ता. गेवराई) येथे ऊसतोड मजुरांसाठी दिवाळी साजरी करण्यात आली.या वेळी मजुरांना फराळ, जेवण आणि आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.उपक्रमाच्या पुढाकारात राज्य उपाध्यक्ष जावेद भैय्या कुरेशी यांचा विशेष सहभाग होता.या कार्यक्रमात प्रवीण आखाडे,जुनेद बागवान विनय मोरे व इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमृत २.० योजने अंतर्गत उद्यान सुशोभीकरण भूमिपूजन




अंबाजोगाई दि २५ (प्रतिनिधी)– अमृत २.० योजने अंतर्गत अंबाजोगाई मधील मंजूर असलेल्या २ उद्यानाचे सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन आमदार सौ नमिताताई मुंदडा यांच्या हस्ते योगेश्वरी मंदिर परिसर येथे करण्यात आले.

अंबाजोगाई शहर विकास कार्यासाठी सतत प्रयत्नशील असून आम जनतेचा आरोग्य, मोकळी हवा,पर्यावरण यासाठी हक्काचे २ उद्याने अद्ययावत सुविधांनी युक्त,मुलांना खेळणे, मॉर्निंग वॉक साठीचा ट्रॅक,पर्यावरण पूरक वातावरण असे २ उद्याने होणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी नंदकिशोरजी मुंदडा,अक्षय भैय्या मुंदडा,भ ज प प्रवक्ते राम कुलकर्णी, रोहिणी पाठक, शोभा लोमटे,डॉ अतुल देशपांडे, गिरीधारीलाल भराडीया,धर्मराज सोळंके,वाजेड खतीब,उल्हास पांडे,सारंग पुजारी,संजय गम्भीरे, प्रशांत आदनाक,वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवराची तसेच मोठया प्रमाणात नागरिक, महिला यांची उपस्थिती होती. या वेळी सूत्रसंचालन प्रकाश बोरगावकर यांनी केले शेवटी अल्पोपहार करण्यात आला.

## खा.बजरंग बप्पा सोनवणे यांचा सत्कार करून दिवाळीनिमित्त पत्रकारांनी दिल्या शुभेच्छा



केज दि २५ (प्रतिनिधी) – जिल्ह्याचे खासदार बजरंगबप्पा सोनवणे यांचा सह्याद्री मराठी पत्रकार संघाच्या वतीने सम्राट बळीराजाची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला. व दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या. शेतकरी पुत्र म्हणून ज्यांनी येडेश्वरी कारखान्याच्या माध्यमा तून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या जीवनात नवसंजीवनी आणून देणारे खासदार बजरंग बप्पा सोनवणे एकमेव होय.

दिवाळीच्या सणातील बालिप्रतिपदा म्हणजेच जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांचा राजा सम्राट बळीराजाचे स्मरण असणारा दिवस. बळीराजाची आठवण राहावी या साठी सहयाद्री मराठी पत्रकार संघ केज तथा महाराष्ट्र राज्य यांच्या कडून सम्राट बळीराजा ची प्रतिमा, शाल, पुष्पहार देऊन सह्याद्री मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी अध्यक्ष गोविंद शिनगारे, प्रदेशाध्यक्ष डॉ. जावेद शेख, कार्याध्यक्ष शहाजी भोसले, केज तालुकाध्यक्ष अनिल ठोंबरे, सचिव डॉ. लतिफ शेख, कार्याध्यक्ष महादेव दौंड, संघटक लक्ष्मीकांत लासीनकर, उपाध्यक्ष दत्तात्रय भाकरे, सहसंघटक, काशीनाथ कातमांडे यांच्या वतीने दिपावली पाडव्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या व यावेळी खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वतीने ही सर्वांना दिपावलीच्या शुभेच्छा देऊन सह्याद्री मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सत्कार समारंभाबाबत समाधान व्यक्त केले.

## डॉ.संपदा मुंडेला न्याय मिळण्यासाठी माजी आमदार डॉ.नारायणराव मुंढे उपोषण करणार

गेवराई दि २५ (प्रतिनिधी)– वडवणी तालुक्यातील कोठरबन येथील महिला डॉक्टर यांनी काही लोकांच्या अत्याचाराला कंटाळून आत्महत्या केली. तेव्हा यातील दोषी व्यक्तीवर मनुष्यवादाचा गुन्हा दाखल करावा या व इतर मागण्यासाठी माजी आमदार नारायणराव मुंडे यांनी २७ ऑक्टोबर रोजी जिल्हा कचेरी समोर लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.सातारा जिल्ह्यातील फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉ.संपदा मुंडे यांनी आत्महत्या केलेली आहे. आत्महत्या केलेल्या महिला डॉक्टर ह्या बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील कोठरबन येथील रहिवासी आहेत. या प्रकरणी माज्यावर अन्याय होत मी आत्महत करेल अशी वरिष्ठांकडे तक्रार पण केली होती. परंतु वरिष्ठांनी त्याकडे दुर्लक्ष केले पीडितेला न्याय मिळावा व सर्व आरोपींवर योग्य ती कारवाई करण्यासाठी व संपूर्ण प्रकरणाची एस.आय. टी. मार्फत चौकशी करून प्रकरणातील दोषींवर सदोष मनुष्यवधा गुन्हा दाखल करावा. या मागणीसाठी माजी आमदार डॉ. नारायणराव मुंढे हे जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे दिनांक २७ ऑक्टोबर २०२५ रोजी एकदिवसीय लाक्षणिक उपोषणाला बसणार आहे.

## डॉ.संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई करा-डॉ. तपसे

केज दि २५ (प्रतिनिधी) फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला वैद्यकीय अधिकारी यांच्या आत्महत्येच्या घटनेने संपूर्ण राज्यातील वैद्यकीय क्षेत्रात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घटनेला कारणीभूत असणाऱ्या दोषींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा द्यावी, अशी सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांची जोरदार मागणी होत आहे.

महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी संघटनेच्या लीगल सेलचे राज्याध्यक्ष डॉ. दत्ता तपसे यांनी सांगितले की, दोषींवर तातडीने कारवाई झाली नाही, तर राज्यातील सर्व डॉक्टर संपावर जाण्यास भाग पडतील.त्यांनी न्याय मिळेपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला . दरम्यान, डॉक्टर संघटनांनी भारतीय दंड संहितेतील कलम ३५३ सरकारी कर्मचाऱ्यावर हल्ला किंवा अडथळा निर्माण करणे, हे कलम सध्या कमकुवतअसल्याचे सांगत ते अधिक मजबूत करण्याची मागणी केली आहे. डॉक्टर संघटनांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर या प्रकरणातील आरोपींना तातडीने शिक्षा झाली नाही किंवा शासनाने ठोस नियमावली लागू केली नाही, तर राज्यभरात तीव्र आंदोलन छेडले जाईल.

या घटनेविषयी वैद्यकीय समुदायात तीव्र नाराजी व्यक्त होत असून, डॉक्टर हे समाजाचे सेवक आहेत त्यांच्यावर होणारे अन्याय थांबले पाहिजेत, असा एकमुखी स्वर राज्यभरा तून उमटत आहे.

# संपादकीय

## विनोदाचे अचूक टायमिंग साधणारा सर्वांचा लाडका 'लक्ष्या'

जवळपास दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज जन्मदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षांच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज – सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म ७१ वर्षापुर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटका प्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला . त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही. कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबाज, थरथराट, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघानी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या मराठीतच. पु ल देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. या चित्रपटात त्याने केलेल्या गंभीर भूमिकेने त्याच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केले. हा चित्रपट तिकीट बारिवर अपयशी ठरला तरी त्यातील त्याच्या गंभीर भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले. लक्ष्याने विनोदी भूमिका अधिक केल्या आणि त्या यशस्वीही झाल्या म्हणून विनोदी अभिनेता असे त्याचे वर्णन करणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. गंभीर भूमिकाही उत्तम प्रकारे करू शकतो हे लक्ष्याने एक होता विदूषक तसेच लेले विरुद्ध लेले आणि सर आले धावून या नाटकातून दाखवून दिले. आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला जन्मदिनी विनम्र अभिवादन!

**तेलगाव जि.प.निवडणुकीसाठी डीपीआयची आढावा बैठक संपन्न**

# मनीषा कांबळे यांचे नाव अजिंक्य चांदणे यांच्याकडून घोषित



दिंद्रुड दि.२५ (प्रतिनिधी) - जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे पडघम वाजले असुन, येत्या काही काळात होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने उमेदवाराची चाचपणी चालू आहे. बीड जिल्ह्यातील तेलगाव जिल्हा परिषद गटासाठी मनीषा नवनाथ कांबळे यांच्या उमेदवारी ची घोषणा डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी काल शुक्रवारी (दि.२४) सायंकाळी आयोजित आढावा बैठकीत केली.

महाविकास आघाडीसोबत डिपीआय हा पक्ष असून जिल्ह्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील राखीव गटांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्याकडे आपण मागणी करणार असल्याचे डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी तेलगाव येथील आढावा बैठकीत सांगितले. यात तेलगाव गटाच्या जागी आपण कुठल्याही परिस्थितीत निवडणूक लढवणार असून या भागात डीपीआयचे युवक जिल्हाध्यक्ष नवनाथ कांबळे यांच्या सुविद्य पत्नी मनीषा कांबळे यांच्या उमेदवारीची घोषणा अजिंक्य चांदणे यांनी शुक्रवारी सायंकाळी येथील आढावा बैठकीत केली. यावेळी बोलताना महाविकास आघाडीने आमचा विचार केला नाही तर आम्ही कुणाच्याही ताटाखालचे मांजर होणार नाही तर स्वबळावर या निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे ही सांगितले. यासाठी समाजासह तेलगाव गटातील मतदारांच्या दारादारात जाऊन मतांची चाचपणी करण्याच्या सूचना चांदणे यांनी कार्यकर्त्यांना दिल्या आहेत. या बैठकीस तेलगाव जिल्हा परिषद गटातील डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया चा बहुसंख्य कार्यकर्ता वर्ग उपस्थित होता. नवनाथ कांबळे हे तेलगाव गटातील मोहखेड येथील रहिवासी असून ते रिपोर्टरचे पत्रकार आणि डीपीआय चे बीड युवक जिल्हाध्यक्ष आहेत. सामाजिक कार्यात कांबळे सदैव अग्रेसर असतात. तेलगाव गटातील प्रत्येक गावात त्यांनी आपल्या सामाजिक दायित्वाने विशेष ओळख निर्माण केली असून, या निवडणुकीत त्यांच्या सुविद्य पत्नी मनीषा नवनाथ कांबळे या महाविकास आघाडीच्या तिकिटावर निवडणूक लढवणार असल्याचे संकेत आहेत.

> **लोकसभा व विधानसभा निवडणुकीत डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडियाने युती धर्म पाळत कसलीही अपेक्षा न ठेवता महाविकास आघाडीचे काम केले. याचीच जाण राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार व खासदार बजरंग सोनवणे ठेवतील व आम्हास या निवडणुकीत न्याय देतील अशी अपेक्षा आहे.**
>
> **अजिंक्य चांदणे**, प्रदेशाध्यक्ष डी पी आय महाराष्ट्र राज्य

# घाटपिंपरी येथील भव्य खुल्या कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्न

घाटपिंपरी दि २५ (प्रतिनिधी)- वाशी तालुक्यातील घाट पिंपरी येथील बंडू तात्या क्रीडा मंडळ आयोजित भव्य खुल्या कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धेत विविध जिल्ह्यातून सुमारे २६ नामांकित संघ सहभागी झाले होते.

प्रथम पारितोषिक २१००० रुपये डॉ. लक्ष्मण सातपुते व मा. सुशीलकुमार पवार यांनी ठेवलेले पारितोषिक जय हनुमान क्रीडा मंडळ, महासांगवी या संघाने पटकाविले, द्वितीय पारितोषिक रुपये १५ हजार, पोपट सातपुते (फौजी) व भरत सातपुते (फौजी) यांनी ठेवलेले पारितोषिक महाराष्ट्र क्रीडा मंडळ, परांडा या संघाने मिळविले, तृतीय पारितोषिक रुपये ११हजार, सतीश सातपुते (इंजिनियर) व महावीर सातपुते(युवा उद्योजक पुणे) यांनी ठेवलेले पारितोषिक स्वराज क्रीडा मंडळ भूम या संघास मिळाले, चतुर्थ पारितोषिक रुपये ७००० श्री बाळासाहेब मांगले व चंद्रकांत सातपुते यांनी ठेवलेले पारितोषिक अंबिका स्पोर्ट्स, बीड या संघास मिळाले, पाचवे पारितोषिक रुपये ५५५५ सुजित



कैलास पाटील यांनी ठेवलेले पारितोषिक बंडू तात्या क्रीडा मंडळ घाटपिंपरी या संघाने मिळविले तर सहावे पारितोषिक रुपये ३५५५ बालाजी सावकार ( ठेवलेले पारितोषिक जय हनुमान क्रीडा मंडळ,महासांगवी या संघास मिळाले, बेस्ट रायडर रुपये २१०० गणेश आप्पा लोखंडे यांनी ठेवलेले पारितोषिक सातपुते आयुष विष्णू यास मिळाले, मॅन ऑफ सिरीज चे रुपये २१०० संतोष पाटील यांनी ठेवलेले पारितोषिक येडेश्वरी क्रीडा मंडळ, येरमाळा संघातील खेळाडूस मिळाले, शिस्तबद्ध संघाचे रुपये २१०० निकम सर यांनी ठेवलेले पारितोषिक आदर्श क्रीडा मंडळ, ईट या संघास मिळाले तर बेस्ट डिफेंडर चे रुपये २१०० धनराज पवार यांनी ठेवलेले पारितोषिक ज्योतिर्लिंग क्रीडा मंडळ, जोतिबाचीवाडी या संघास मिळाले. खेळाडूंना ट्रॅकसूट किरण सुरवसे यांनी दिले.

# माजी सभापती पोपट धनवटे अंमळनेर सर्कलमधुन निवडणुक लढविण्यास इच्छुक

पिंपळवंडी दि.२५(प्रतिनिधी) पाटोदा तालुक्यातीत अंमळनेर जिल्हा परिषद गटातून उमेदवारी मिळावी आणि त्या माध्यमातून एकनिष्ठतेची पोचपावती द्यावी अशी आग्रहाची मागणी माजी सभापती तथा सरपंच पोपट धनवटे (कुसळंब) यांनी आ.सुरेश आण्णा धस यांच्याकडे केली आहे.यावेळी पत्रकारांशी बोलताना पोपट धनवटे म्हणाले की, आण्णाचा आदेश इमाने इतबारे मानत पाटोदा तालुक्यातील गावात आणि कुसळंब ग्रामपंचायतीच्या माध्यमातून अनेक कामे केली.आण्णांनी विश्वास टाकल्यामूळे पाटोदा पंचायत समितीचे उपसभापती पद भूषविले. त्यावेळी जनसंपर्क ठेवत जिल्हा परिषद गटातून व पंचायतीच्या गणातून जनतेची कामे केली.इच्छा असो अथवा नसो आण्णा सांगतील त्या उमेदवाराच्या पाठीशी राहून कामे करत राहीलो,यावेळी अंमळनेर जिल्हा परिषद गट हा ओबीसी सर्वसाधारणसाठी आरक्षीत



राहीला असुन माझ्या कामाच्या अनुभवावर संघातून उमेदवारी देवून माझ्या पाठीवर यशाचा आशिर्वाद द्यावा,अशी अपेक्षा व्यक्त केली असुन आ.सुरेश आण्णा ती पुर्ण करतील असा विश्वास देखील व्यक्त केला आहे. जनतेचा व अंमळनेर गटाचा आण्णावर असणारा विश्वास साध्य करण्यासाठी एकनिष्ठ कार्यकत्यास संधी द्यावी अशी पोपट धनवटे यांनी आण्णाकडे मागणी केली आहे.त्यांचे सहकारी देखील माजी सरपंच पोपट धनवटे यांना उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्नशील आहेत.एकंदरीत आ.सुरेश धस यांनी अंमळनेर गटातुन उमेदवारी दिल्यास निवडणुक लढवुण जनतेचा विश्वास सार्थक ठरवुत असे पोपट धनवटे यांनी सांगितले.

# स्नेहसंमेलनातुन विद्यार्थी,शिक्षक यांनी एकमेकांशी संवाद साधत शाळेतील जुन्या आठवणींना दिला उजाळा



## २२ वर्षांनी भेटलेल्या मित्र-मैत्रिणींचे डोळे पाणावले

माजलगाव दि.२५ (प्रतिनिधी )- मित्र म्हटले की गप्पा आणि शाळेतील बालपणीचे मित्र म्हटले कि आठवणींना उजाळा. अशाच प्रकारे माजलगाव तालुक्यातील माध्यमिक विद्यालय तालखेड शाळेच्या २००३ च्या माजी विद्यार्थ्यांनी शुक्रवार (२४) एकत्र येत आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला आहे. यावेळी अनेकांचे डोळे पाणावले होते. तर विद्यार्थी आणि शिक्षक यांनी एकमेकांशी संवाद साधत शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला. सदरील कार्यक्रमाच्या अगोदर सर्व शिक्षिकांचे शाळेच्या मुख्य गेट पासून पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. अध्यक्ष व प्रमुख पाहुणे व सर्व शिक्षकांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

शाळेतील आठवणी नेहमीच हव्याहव्याशा वाटतात. मात्र शिक्षणाचे पुरेसे धडे घेतल्यानंतर प्रत्येक विद्यार्थी आपल्या कामधंद्यामध्ये व्यस्त होतो. नवनवीन मित्र-मैत्रिणी आयुष्यात येत असतात. मात्र शाळेतील मित्र आणि त्याच्या सोबतचे क्षण हे विसरता येत नाहीत. नेहमीच आपण आपल्या शाळेतील आठवणी एकमेकांशी शेअर करत असतो. अशाच शालेय मित्रांनी एकत्र येऊन, स्नेहसंमेलन साजरे करून आपल्या शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देण्याची कल्पना किती सुंदर असते हे माजलगाव तालुक्यातील माध्यमिक विद्यालय तालखेड शाळेमध्ये पहायला मिळाले आहे. या शाळेने आम्हाला समाजामध्ये ठामपणे उभे राहण्याची प्रेरणादायी दिली असल्याची भावना अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगत मध्ये व्यक्त केली. तब्बल २२ वर्षानी एकत्र येत पुन्हा आपल्या शाळेमध्ये वर्गातील बकावर बसून, या विद्यार्थ्यांनी आपापले अनुभव आणि जुन्या आठवणी व्यक्त करताना डोळ्यांच्या पापाण्या पाणावलेल्या पहायला मिळाल्या. आपल्या बालपणातील शाळेतील दिबस पुन्हा अनुभवायला मिळणे ही सर्वात मोठी आणि आनंदाची बाब आहे. असं म्हणतात कि बालपण गेलं कि पुन्हा मिळत नाही. मात्र आजच्या डिजिटल युगामुळे हे शक्य झाले आहे. सोशल मीडियाचा आधार घेत २२वर्षानी पुन्हा एकदा बालपण जगण्याची संधी आता प्रत्येकाला मिळत आहे. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक जी.डी. शिंदे .हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून रिंगणे ए.बी. होते .यावेळी शाळेतील शिक्षक भगवान जाधव ,भगवान रिंगणे , भगत सर, निसर्गंध मॅडम सुभाष मुळे सर , सुनीता राऊत मॅडम सखाराम रोडे, अशोक शिंदे उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाचे प्रस्ताविक देविदास जाधव यांनी केले. तर सूत्रसंचालन निवेदक अशोक वाडेकर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आणि घडवून आणण्यासाठी डॉ.इनुस शेख,पवन चांडक, शैलेश चांडक,दीपक मोरे,राधा ठोंबरे, मीरा सपाटे, सिद्धेश्वर हुंबे दत्ता शिरसाट लक्ष्मण लेंडाळ यांनी परिश्रम घेतले. शेवटी उपस्थित सर्वांचे आभार प्रदर्शन पांडुरंग शिंदे यांनी मानले.

# अंबाजोगाईत आजपासून देवी भागवत ज्ञानयज्ञ सोहळा

अंबाजोगाई दि.२५(प्रतिनिधी):- गुरुदेव सर्वश्री आशुतोष महाराजजी यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली दिव्य ज्योति जाग्रती संस्थान शाखा लातूरतर्फे आयोजित श्रीमद् देवी भागवत महापुराण ज्ञानयज्ञ कथेची सुरुवात आज भव्य आणि दिव्य अशा कलश यात्रेने झाली.

या कलश यात्रेचा शुभारंभ आ.सौ.नमिताताई मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आला. विशेष म्हणजे ५०० महिलांनी डोक्यावर पवित्र कलश घेऊन यात्रेत सहभाग नोंदविला. हे दृश्य अत्यंत भव्य, भाविकांच्या भक्तिभावाने नटलेले आणि दर्शनास विलोभनीय असे होते. यात्रेच्या मार्गावर उभा असलेला नागरिक भावविश्वात हरवून या यात्रेचे कौतुक करीत होता. देवीची विशाल प्रतिमा असलेला रथ, धार्मिक झांज-पथके व भक्तीमय घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले. आध्यात्मिकतेचा आणि स्त्रीशक्तीचा संगम या यात्रेमध्ये सुंदररीत्या अनुभवायला मिळाला. या यात्रेनंतर आज दि.२५ ऑक्टोबरपासून श्रीमद् देवी भागवत महापुराण ज्ञानयज्ञ कथेचा शुभारंभ होणार आहे. साध्वी अदिति भारती जी (शिष्या सर्वश्री आशुतोष महाराजजी) यांच्या सुमधुर वाणीमधून कथा दि.२५ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत दररोज सायंकाळी ३ ते ७ या वेळेत योगेश्वरी महाविद्यालय ग्राउंड, अंबाजोगाई येथे होणार आहे. या सात दिवसीय ज्ञानयज्ञातून समाजात भक्ती, ब्रह्मज्ञानाचा संदेश पोहोचविण्याचा उद्देश असून दिव्य ज्योती परिवाराने सर्व भाविकांना या दिव्य सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

# सामाजिक व पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वांच्या सेवेसाठी कायम कार्यरत राहणार-अविनाश कदम



आष्टी दि २५ (प्रतिनिधी)- आष्टी शहरांसह तालुक्यात माझ्या संपर्कात आलेल्या प्रत्येकानेच आपल्यावर मनापासून प्रेम केले असून या प्रेमाची शिदोरी घेत आपण कार्यरत आहोत. यापुढेही समाजसेवा करीत आणि पत्रकार म्हणून सर्वांच्या सेवेसाठी अधिक जोमाने कार्यरत राहुत असा विश्वास आष्टी युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा आष्टी तालुका प्रतिनिधी अविनाश कदम यांनी व्यक्त केला. दरम्यान मित्र परिवाराच्या वतीने व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कदम यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला.पत्रकार अविनाश कदम यांचा वाढदिवस २१ ऑक्टोबर रोजी आष्टी शहर व परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. दिवसभर विविध ठिकाणी वाढदिवसानिमित्त अविनाश कदम यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलतांना पत्रकार अविनाश कदम यांनी सांगितले की, आष्टी शहरांसह तालुक्यातील नागरिकांनी व मित्र परिवार, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आपल्यावर मनापासून प्रेम असून मी एक पत्रकार म्हणून सर्वांसाठी जे शक्य आहे ते आपल्या सामाजिक कार्याच्या व लेखनीच्या माध्यमातून काम करण्याचा प्रयत्न केला आहे. आपले आशिर्वाद आणि सहकार्य माझ्या पुढील आयुष्यासाठी अत्यंत महत्वाचे असून यापुढेही आपल्या सेवेत अधिक जोमाने कार्यरत राहुत असा विश्वास पत्रकार कदम यांनी व्यक्त केला.आष्टी पाटोदा शिरूरचे आमदार सुरेश धस,माजी आ भिमराव धोंडे,माजी आ साहेबराव दरेकर, माजी आ बाळासाहेब आजबे,तहसीलदार वैशाली पाटील, शिवसेनेच्या नेत्या रेश्माताई जगताप, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सतिश शिंदे, पोलिस निरीक्षक शरद भुतेकर, गटशिक्षणाधिकारी सीमा काळे यांच्यासह राजकीय व अधिकारी, सरपंच, उपसरपंच, शैक्षणिक, सामाजिक, संपादक, धार्मिक, पत्रकार आदी क्षेत्रांतील मान्यवरांनी व मित्र परिवार यांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, भ्रमणध्वनी, सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

# सामाजिक संघर्ष धान्य बँकेने १२५ गरजवंत कुटुंबांना केले किराणा किटचे

गेवराई दि.२५ (प्रतिनिधी) - तालुक्यात गेल्या आठ वर्षांपासून नावारूपाला आलेल्या सामाजिक संघर्ष धान्य बँकेच्या माध्यमातून एक घास गरजवंतांना या उपक्रमाद्वारे परिसरातील गरीब, वंचित, शोषित, पीडित, निराधार, अंध - अपंग, वयोवृध्द असलेल्या व्यक्तींना दिवाळीनिमित्त त्यांची दिवाळी गोड व्हावी म्हणून तलवाडा, मादळमोही, उमापूर, धोंडराई, गेवराई याठिकाणी दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सामाजिक संघर्ष धान्य बँक गेवराई टीमच्या आवाहनाला प्रतिसाद देत समाजातील दानशूर दात्यांनी एक लाख तीस हजार रुपयाची मदत अवघ्या पाच दिवसात जमा केली. यामुळे मादळमोही,



उमापूर, धोंडराई, तलवाडा, गेवराई येथील गरजवंत कुटुंबांना किराणा किटचे वाटप करण्यात आले. समाजातील दानशूर लोकांच्या मदतीतून १२५ कुटुंबाची दिवाळी गोड झाली आहे. या सर्व दात्यांचे सामाजिक संघर्ष धान्य बँकेच्या वतीने आभार मानण्यात आले. हा उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सामाजिक संघर्ष धान्य बँकेचे संस्थापक अध्यक्ष झेंडेकर सर, धर्मराज करपे सर, सुभाष काळे सर, संजय पांढरे सर, भोपळे सर, नवले सर, सोळुंके सर, गावडे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. यावेळी आदर्श शिक्षक ओमप्रकाश हात्ते सर, दिलीप काळे, बाळासाहेब कासकर, अशोक कासकर, कैलास आप्पा मोरे, संदीप भैय्या कचरे, सतीश कासकर, गजानन थोरात, लक्ष्मण राऊत व इतर मान्यवर उपस्थित होते.

## अमृत संस्थेतर्फे टायपिंग/स्टेनो परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शुल्क प्रतिपूर्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

बीड - खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी अमृत संस्थेतर्फे एक महत्त्वपूर्ण योजना राबवण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे जून २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय संगणक टंकलेखन बेसिक कोर्स प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) आणि ऑनलाईन लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांनी भरलेले परीक्षा शुल्क अमृत संस्थेतर्फे परत दिले जाणार आहे. ही योजना आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे. राज्य परीक्षा परिषद दरवर्षी दोनदा या परीक्षा घेत असते. राज्यभरातील तीन हजारांहून अधिक टंकलेखन संस्थांमधून दरवर्षी जवळपास तीन ते चार लाख विद्यार्थी या परीक्षा देतात. अनेक विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे हे कोर्स करणे कठीण जाते, मात्र अमृतच्या या उपक्रमामुळे पात्र विद्यार्थ्यांना शुल्कपरताव्याच्या स्वरूपात प्रोत्साहन मिळून त्यांचे प्रशिक्षण पूर्णतः विनामूल्य होणार आहे.

# दिवाळीनिमित्त सरपंच महादेव घुले यांच्याकडून सर्कलमध्ये साखर वाटप



पिंपळवंडी दि.२५ (प्रतिनिधी):- पाटोदा तालुक्यातील सौताडा येथील सरपंच तथा युवा नेते महादेव घुले यांच्या वतीने दिवाळी सणाचे औचित्य साधून अंमळनेर जिल्हा परिषद गटातील गावागावात गोरगरीब कुटुंबांना तसेच पिंपळवंडी येथे भजनी मंडळ,आराधी मंडळातील सर्व सदस्य व सामान्य गोरगरीब कुटुंबांना प्रत्येकी ५ किलो साखर वाटप करून गोरगरिबांना दिवाळीत हातभार लावल्याने लाभार्थींच्या चेहऱ्यावर आनंद पहावयास मिळाला. पिंपळवंडी येथे हनुमान मंदिरात दि.२३ गुरुवार रोजी हा कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी शेख मेहबूब (राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष शरद पवार गट तथा पक्षाचे प्रवक्ता),अर्जुन आबा पवार, सुग्रीव पवार,विनोद पवार,दत्ता शिंदे, नामदेव पेचे,अक्षय पेचे,स्वप्निल घुले, सुरज शिंदे,वैभव सानप,योगीराज शिंदे,बाबा घुले,किसन अण्णा पवार, अशोक तात्या पवार,बाबासाहेब पुलावळे,ग्रामस्थ व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रसंगी महबूब शेख म्हणाले की,यावर्षी अनेक गावात अतिवृष्टी झाली तसेच अंमळनेर सर्कल मध्येही अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांच्या शेतात,गोरगरिबांच्या घराघरात पाणी शिरून मोठ्या प्रमाणात नुकसानीची हानी पोहोचली.यासाठी गोरगरिबांना फुल ना फुलाची पाकळी या उद्देशाने सौताडा गावचे युवा सरपंच महादेव घुले यांनी प्रत्येक कुटुंबांना ५ किलो साखर वाटपाचा उपक्रम राबवून गोरगरिबांची दिवाळी सणास हातभार लावला.त्यांचा हा उपक्रम खरोखरच कौतुकास्पद आहे.सौताडा येथील सरपंच तथा युवा नेते महादेव घुले यांच्या वतीने दिवाळी सणाचे औचित्य साधून अंमळनेर जिल्हा परिषद गटातील गावागावात गोरगरीब कुटुंबांना तसेच पिंपळवंडी येथे भजनी मंडळ,आराधी मंडळातील सर्व सदस्य व सामान्य गोरगरीब कुटुंबांना प्रत्येकी ५ किलो साखर वाटप करून गोरगरिबांना दिवाळीत हातभार लावल्याने लाभार्थींच्या चेहऱ्यावर आनंद पहावयास मिळाला. पिंपळवंडी येथे हनुमान मंदिरात दि.२३ गुरुवार रोजी हा कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी शेख मेहबूब (राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष शरद पवार गट तथा पक्षाचे प्रवक्ता),अर्जुन आबा पवार, सुग्रीव पवार,विनोद पवार,दत्ता शिंदे, नामदेव पेचे,अक्षय पेचे,स्वप्निल घुले, सुरज शिंदे,वैभव सानप,योगीराज शिंदे,बाबा घुले,किसन अण्णा पवार, अशोक तात्या पवार,बाबासाहेब पुलावळे,ग्रामस्थ व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी महादेव घुले म्हणाले की,गोरगरीब व शेतकऱ्यांच्या सुख दुःखात सदैव सामील राहून मदत करण्यास कटीबद्ध राहील.या उपक्रमांतर्गत पिंपळवंडी,सुपा, निवडुंगा,अंतापुर,कोतन,धोपटवाडी आदी गावातील ग्रामस्थांच्या भेटी घेऊन आडी-अडचणी समजून घेऊन साखर वाटप करण्यात आली.

# अंग्रेजो के जमाने का जेलर-असराणी



रमेश सिप्पी यांचा शोले हा चित्रपट अनेक गोष्टीमुळे लक्षात राहतो. या चित्रपटातील प्रत्येक कलाकार संजीवकुमार, धर्मेंद्र, अमिताभ बच्चन, गब्बर सिंग अर्थात अमजदखान, हेमामालिनी या सर्वासोबत अजून एक नाव आपण विसरू शकत नाही ते म्हणजे असराणी. शोले चित्रपटातील त्याची अंग्रेजो के जमाने का जेलरची भूमिका अनेकांना खळखळून हसायला लावते. जब हम नहीं बदल सकते तो तुम क्या बदलोगे अहा! हा डायलॉग अन्य कुणी त्या पद्धतीने म्हणूच शकत नाही. विनोदाचा तो खरा बादशहा होता. असरानी यांनी त्यांच्या करिअरमध्ये अनेक छोट्या मोठ्या चित्रपटांत काम केले. परंतु त्यांनी साकारलेल्या काही विनोदी भूमिका मात्र लोकांच्या आजही स्मरणात आहेत. त्यातील एक चित्रपट म्हणजे अर्थात शोले. शोले चित्रपटात त्यांनी साकारेलल्या जेलरच्या भूमिकेचे सर्वत्र कौतुक झाले होते. नंतर काही चित्रपटात त्यांच्या जोडीला कादर खान, जॉनी लिव्हर, अनुपम खेर असे अनेक कलाकार मिळून प्रेक्षकांना खूप हसविण्याचे काम केले. विनोद करण्याची लकब आणि संवाद फेक उत्तम असल्याने त्यांच्या विनोदाला लोकांनी डोक्यावर घेतले होते. रफूचक्कर, बालिका वधू, पति, पत्नी और वो यांसारख्या चित्रपटांमध्ये त्यांची बहुरंगी अदा आणि टायमिंग पाहण्यासारखी होती. उतरत्या काळात देखील त्यांनी आपल्या विनोदाने ''धमाल ''केली. असराणी यांच्या मते, ''कॉमेडी म्हणजे फक्त हसवणं नव्हे, तर सत्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग आहे. हसण्याच्या माध्यमातून माणूस आपल्या भीतीतून, दांभिकतेतून आणि रूढ चौकटीतून बाहेर पडतो.''असरानी हे असे एक अभिनेते होते, ज्यांनी आपल्या कलेतून हिंदी सिनेमाला हलक्या-फुलक्या विनोदाची प्रतिष्ठा तर शिकवलीच, पण एक चरित्र अभिनेता म्हणून स्वतःची वेगळी छाप देखील उमटवली आहे.

त्यांचं पूर्ण नाव गोवर्धन असरानी असे होतं. १ जानेवारी १९४१ रोजी राजस्थानमधील जयपूर येथे त्यांचा जन्म झाला होता. असरानी यांना लहानपणापासूनच अभिनय आणि चित्रपटांची आवड होती, म्हणून ते घरातून पळून जाऊन चित्रपट बघायचे. त्यांचे वडील जयपूरमधील एका कार्पेट कंपनीचे मॅनेजर होते. त्यांचे शालेय शिक्षण जयपूरमध्ये झाले होते. मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतरच त्यांनी सिनेमांत जाण्याचा निर्णय घेतला होता, परंतु सुरुवातीच्या काळातील प्रयत्नांनंतरही त्यांचा सिनेमांचा प्रवास सुरू होऊ शकला नाही. यानंतर त्यांनी ठरवलं की, महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुण्यातील फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये अभिनयाचे धडे घ्यायचे.जयपूरच्या ऑल इंडिया रेडिओमध्ये त्यांनी दोन-तीन वर्षे काम केले आणि त्यानंतर पुण्यातील फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला. असराणी हे याच इन्स्टिटयूटमधून गोल्ड मेडल मिळवणारे पहिले विद्यार्थी होते, हे विशेष बाब आहे. शिक्षण पूर्ण केल्यावर काही काळ त्यांनी याच इन्स्टिटयूटमध्ये शिकविण्याचे काम देखील केले होते. पुण्यात असरानींना अभिनयातील प्रसिद्ध शिक्षक रोशन तनेजा यांनी शिकवले. स्वतःची ओळख व छाप निर्माण होण्यासाठी काहीतरी वेगळं करावे असे त्यावेळी त्यांनी ठरविले. ऋषिकेश मुखर्जी यांच्या गुड्डी या चित्रपटाने त्यांच्या अभिनयाला सुरुवात झाली. प्रचंड मेहनत करण्याची तयारी आणि जिद्द यामुळे ते कोणत्याही चित्रपटातील लहान लहान भूमिका देखील स्वीकारले. त्यांनी अमिताभ बच्चन सोबत नमक हराम (१९७३) या चित्रपटात केलेल्या भूमिकेचे फारच कौतुक झाले. त्यानंतर मात्र त्यांनी कधी मागे वळून पाहिलेच नाही. पुढे कोशीश (१९७२), बावर्ची (१९७२), परिचय (१९७२), अभिमान (१९७३), मेहबुबा (१९७६), पलकों की छाव मे (१९७७), दो लडके दोनो कडके (१९७९), बंदीश (१९८०) यासारख्या चित्रपटांत काम केले. असरानी यांनी जो जीता वही सिकंदर (१९९२), गर्दीश (१९९३), घरवाली बहरवाली (१९९५) बडे मियाँ छोटे मियाँ (१९९८) सारख्या चित्रपटांमध्ये विनोदी भूमिका साकारल्या. त्यानंतर हेरा फेरी (२०००), हलचल (२००४), गरम मसाला (२००५), चुप चुप के (२००), भागम भाग (२००६), दे दना दान (२००९), बोल बच्चन (२०१२) यासारख्या अलिकडच्या चित्रपटांतही विनोदी कलाकारांच्या भूमिकेत काम केले. आसराणी यांनी ३५० पेक्षा जास्त हिंदी चित्रपटांमध्ये काम केले आहे. सोबतच त्यांनी गुजराती, पंजाबी, बंगाली आणि उर्दू चित्रपटांमध्येही अभिनय केला आहे. १९७० ते १९८० या दशकात ते विनोदी भूमिकांसाठी अत्यंत लोकप्रिय होते. त्यांनी अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये विनोदी सहायक भूमिकांमधून प्रेक्षकांचे मनोरंजन केले. सर्वोत्कृष्ट विनोदी कलाकार म्हणून त्यांना दोन वेळा फिल्मफेअर पुरस्काराने गौरवले गेले आहे. त्यांनी त्यांच्या वेगळ्या शैलीतील संवादफेक, हावभाव आणि टाइमिंगमुळे स्वतःची खास ओळख निर्माण केली होती. असराणी हे केवळ विनोदी कलाकार नव्हते, तर ते एक प्रशिक्षित, विचारपूर्वक अभिनय करणारे, शिस्तबद्ध कलाकार होते, ज्यांनी प्रेक्षकांना हसवण्याबरोबरच विचार करायला लावलं. अश्या हुरहुन्नरी कलाकाराचे २० ऑक्टोबर २०२५ रोजी मुंबई येथे त्यांचा वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले. त्यांनी आपल्या पत्नी मंजू असराणी यांना जाताना सांगितले की, सर्वकाही शांततेत पार पाडा, कोणालाही काही सांगू नका. प्रसिद्धी माध्यमापासून नेहमीच दूर राहणारे असराणी अगदी शांततेत या जगाचा निरोप घेतला. सर्वाना हसवून खिळवून ठेवणारा हा बादशहा जाताना मात्र सर्वाना रडवून गेला. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती प्रदान करो, हीच प्रार्थना.

**– नासा येवतीकर**

# शेतकऱ्यांसाठी केलेल्या मागणीला यश

## ३० ऑक्टोबरपासून सोयाबीन नोंदणीला सुरुवात-धनंजय गुंदेकर

## आ.संदीप क्षीरसागर यांनी मुख्यमंत्र्यांकडे केला होता पत्रव्यवहार

सोयाबीन खाजगी भाव : ३१०० ते ४१०० प्रति क्विंटल
सोयाबीन नाफेड खरेदी भाव : ५३२८ रुपये प्रति क्विंटल
फरक जवळपास १४०० ते १५०० प्रति क्विंटल (प्रत निहाय)

बीड (प्रतिनिधी) : गेल्या काही दिवसांपासून सोयाबीन हमीभाव नोंदणी व खरेदी प्रक्रिया सुरू करण्यात यावी अशी मागणी राज्य सरकारकडे करण्यात आलेली होती. मात्र या मागणीकडे राज्य सरकारने अद्याप देखील लक्ष दिलेले नव्हते, काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत घोषणा केली आहे. यासाठी बीड विधानसभेचे आमदार संदीप क्षीरसागर यांनीही मुख्यमंत्र्यांशी पत्रव्यवहार केला होता.या नोंदणी मागणीला यश आले असले तरी खरेदी प्रक्रिया देखील तत्काळ सुरू करणे आवश्यक असल्याचे संचालक धनंजय गुंदेकर यांनी म्हटले आहे.

राज्यात सोयाबीनची खरेदी सुरु करण्याच्या हालचाली सुरु आहेत. राज्यात हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी ३० ऑक्टोबरपासून नोंदणी सुरु होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तर राज्य सरकारने केंद्राकडे १० लाख टन सोयाबीन खरेदीला मंजुरी देण्याची मागणी केली आहे. याचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवला असून लवकरच मंजुरी मिळेल, अशी माहिती कळली आहे. बीड जिल्ह्यात सोयाबीन क्षेत्र ५०% पेक्षा अधिक आहे. त्यातही बीड तालुक्यातील बालाघाट व मैदानी परिसरातील बहुतांश क्षेत्र सोयाबीन लागवडीखालील आहे. सध्या सोयाबीन खाजगी भाव ३१०० ते ४१०० दरम्यान आहे. मात्र हमीभाव हा ५३२८ रुपये प्रति क्विंटल असून दोन्हीत फरक जवळपास १४०० ते १५०० रुपयांचा दिसून येतो आहे. म्हणून ज्या शेतकऱ्यांनी अद्याप देखील सोयाबीन विक्री केलेली नसेल त्या शेतकऱ्यांनी आपली सोयाबीन हमीभावाने विक्री करावी असे आवाहन संचालक धनंजय गुंदेकर यांनी केले आहे.

# गेवराई तालुक्यात लंपी आजारामुळे पशुपालक संकटात

### पशुसंवर्धन विभागाने तात्काळ उपाययोजना करा-युवा नेते बदाम पौळ



गेवराई दि. २५ (प्रतिनिधी) गेवराई तालुक्यातील बंगालीपिंपळा, तांदळा, कोळगाव, सुशी आणि परिसरात अनेक गावांमध्ये लंपी रोगाने जनावरांचा जीव धोक्यात आला आहे. अतिवृष्टीमुळे आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर आता लंपी आजाराची भिती निर्माण झाली आहे. लंपी आजार झपाट्याने वाढत असून शेकडो जनावरांना आजाराची लागण झाली आहे. या आजाराने अनेक शेतकऱ्यांची जनावरे दगावली तर अनेक जनावरे गंभीर असून पशुपालक, शेतकऱ्यांमध्ये भिती व्यक्त केली जात आहे. तरी पशुसंवर्धन विभागाने तात्काळ उपाययोजना कराव्यात अशी मागणी युवा नेते बदाम पौळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

गेवराई तालुक्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला असतानाच आता शेकडो जनावरांना लंपी आजाराची लागण झाली आहे. तर दुसरीकडे लंपी आजारामुळे सध्या अनेक जनावरे या आजारामुळे त्रस्त असून त्यांच्या जिवाची लाहीलाही होत आहे. शेकडो जनावरे या आजाराची शिकार होत असताना पशुसंवर्धन विभाग मात्र गाढ झोपेत असल्याचे दिसून येत आहे. रोगाचा प्रसार रोखण्यासाठी त्वरित सरकारी हस्तक्षेप, लसीकरण आणि योग्य औषधोपचार आवश्यक आहेत. मात्र, प्रशासनाने अद्याप सावधगिरी बाळगलेली नाही, ज्यामुळे संकट अजूनच गंभीर होत आहे. तरी पशुसंवर्धन विभागाने तात्काळ उपाययोजना आखाव्यात अशी मागणी बंगालीपिंपळा गणातील युवा नेते बदाम पौळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

# थकीत पगारासाठी वनमजुरांचे २८ पासून बेमुदत धरणे आंदोलन

नांदेड (प्रतिनिधी) जिल्ह्यातील सामाजिक वनीकरण व वनविभागातील शेकडो वनमजुरांच्या न्याय्य मागण्यांकडे प्रशासनाने वारंवार दुर्लक्ष केल्यामुळे अखेर मजुरांनी संघर्षाचा मार्ग स्वीकारला आहे. शासकीय औद्योगिक संघटनेच्या वतीने दिनांक २८ ऑक्टोबर २०२५ पासून विभागीय वन अधिकारी व उपवनसंरक्षक कार्यालय, नांदेड येथे बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येणार आहे.

या आंदोलनाद्वारे वनमजुरांना कायमस्वरूपी कामावर घ्यावे, तसेच त्यांचा थकीत पगार तात्काळ अदा करावा, या दोन प्रमुख मागण्या पुढे करण्यात आल्या आहेत. ॲड.कॉ.प्रदीप नागपूरकर यांनी सांगितले की, वनमजुरांचे हक्काचे पैसे अडकवून ठेवणे म्हणजे अन्याय आहे. शासनाने तात्काळ सर्व थकीत पगार वितरित करून मजुरांना कायमस्वरूपी नोकरी द्यावी. अन्यथा हे बेमुदत धरणे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. या आंदोलनाला जिल्ह्यातील विविध कामगार संघटनांचे पाठबळ मिळत असून, २८ ऑक्टोबरपासून नांदेड जिल्ह्यातील वनमजुरांचा मोठा जमाव होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

## बीड जिल्ह्यात अतिवृष्टीग्रस्त गरीब कुटुंबांना

# किराणा किट व उबदार कंबल वाटप





बीड दि.२६ (प्रतिनिधी) : मुंबई येथील ज्येष्ठ विधीज्ञ श्री. दिनेश बी. खैरे (माजी मुख्य सरकारी वकील, मॅट कोर्ट, मुंबई) आणि त्यांचे सहकारी विधीज्ञ नरेंद्रजी राजपुरोहित सर, सह्याद्री समाज, मुंबई. यांच्या पुढाकारातून, तसेच रेणुका माऊली सेवाभावी संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त गरीब कुटुंबांना मदतीचा हात देण्यात आला.

अतिवृष्टी, पावसामुळे आणि शेतमालाचे मोठे नुकसान झाल्याने अनेक हातावर पोट असणाऱ्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली होती. या परिस्थितीत अनेक गरजू कुटुंबांना किराणा किट तसेच येणाऱ्या थंडीमध्ये उबदार कंबल व रग वाटप करण्यात आले.या उपक्रमात जिव्हाळा बेघर निवारा केंद्र चे समाजसेवक अभिजीत वैद्य आणि राजू वंजारे यांचे विशेष योगदान राहिले. हे दोघे समाजसेवक गेल्या अनेक वर्षांपासून बीड जिल्ह्यातील शेतकरी, गरीब कुटुंबे, पूरग्रस्त आणि बेघर लोकांसाठी सतत कार्यरत आहेत. मुंबईसह इतर शहरांतील दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून ते मदतीचे हात पुढे करत असतात.

नदी खोलीकरण, पूरग्रस्तांना मदत, गरीबांना किराणा किट वाटप, तसेच अनाथ आणि बेघरांना मागील आठ वर्षांपासून भाजी मंडई परिसरात निवारा आणि अन्न देण्याचे कार्य हे जिव्हाळा बेघर निवारा केंद्र सतत करत आहे. शासनाच्या कोणत्याही निधीशिवाय समाजातील दुर्बल घटकांना प्रवाहात आणण्याचे हे कार्य सर्व स्तरांतून कौतुकास्पद ठरत आहे.

अशा प्रकारच्या सेवाभावी उपक्रमांमुळे समाजातील संवेदनशीलतेचा व मानवतेचा संदेश अधिक दृढ होत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

# सोशल मीडियावर भावी नगरसेवक, फिक्स नगरसेवकांची गर्दी

## प्रभाग क्र.११ मधील रस्ते,नाल्याची दयनीय अवस्था दूर करण्यासाठी एकही जण पुढे येईना

बीड (प्रतिनिधी) : प्रभाग क्र.११अमराई,बालेपीर मधील परवेझ सर यांच्या घरापासून हमीद इंजिनिअर यांच्या घरापर्यंत रस्ता अतिशय खराब झालेला आहे.या रस्त्याला मोठं-मोठे खड्डे पडले असून,नालीही नसल्याने सांडपाणी रस्त्यावर येऊन त्यामधून रहिवाश्यांना चालणेही अवघड झाले आहे.खराब रस्त्यांमुळे वारंवार अपघात होत आहे व बऱ्याच लोकांचे मणक्याचे ऑपरेशन व इतर आजार यामुळे उद्धभवले आहेत.कित्येक वर्षांपासून वार्डातील रहिवासी रस्ता बनविण्याची मागणी करीत आहेत.महिला,वृद्ध नागरिक यांना या रस्त्यावरून चालताही येत नाही.याची दखल घेण्यास कोणी तय्यार नाही.तर दुसरी कडे येणाऱ्या नगरपरिषद निवडणूकित भावी नगरसेवक, फिक्स नगरसेवक म्हणून अनेकांना स्वप्न पडू लागले आहेत आणि यातील बहुतांश सोशल मीडिया वर पोस्ट करताना दिसत आहेत परंतु प्रत्येक्ष सामान्य नागरिकांच्या असलेल्या समस्या सोडविण्यासाठी कोणीच पुढाकार घेत नसल्याचे दिसत आहे.प्रभाग ११ अमराई, बालेपीर मधील समस्या सोडविण्याचे निवेदन अनेकदा मा.विभागीय आयुक्त, मा.जिल्हाधिकारी, न.प.मुख्याधिकारी,कार्यकारी अभियंता.सा.बां.विभाग यांना निवेदन देण्यात आलेले आहे.शासन दरबारी आतापर्यंत कित्येक निवेदन देण्यात आले परंतु शासनामार्फत याची कसल्याही प्रकारची दखल घेण्यात आली नाही.सदरील रस्त्याचे काम करून रस्त्याच्या व नालीच्या असलेल्या समस्या सोडविण्यात याव्यात ही मागणी प्रभागातील नागरिकांची आहे.प्रभागातील नागरिकांच्या विनंतीला मान देऊन प्रभाग क्र.११ अमराई गल्लीतील परवेज सर यांच्या घरापासून ते हमीद इंजिनियर यांच्या घरापर्यंत पूर्ण रस्त्याचे व नाल्याचे काम करून समस्या सोडविण्यात याव्यात ही मागणी सर्व नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे.

# बीड जिल्हा परिषदेचे सीईओ जितीन रहमान यांची आदर्श ग्रामपंचायत आवरगावला भेट



किल्ले धारूर (प्रतिनिधी) : आदर्श ग्रामपंचायत म्हणून नावारूपास आलेल्या धारूर तालुक्यातील आवरगाव येथे बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी बीड जिल्ह्यातील पहिलीच असणारी डिजिटल ग्रामपंचायत म्हणजे आवरगाव आहे .या प्रत्येक घरावर ही डिजिटल नेम प्लेट लावण्यात येणार आहे त्यात त्या कुटुंबाची ऐकून मालमत्ता दिसणार आहे.

या डिजिटल नेम प्लेट चा आज सीईओ साहेबांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला,व ग्रामपंचायतीच्या स्वच्छता कर्मचारी महिलांचा देखील रहमान साहेबांच्या हस्ते साडी चोळी देऊन सन्मान करण्यात आला व सार्वजनिक ठिकाणांची पाहणी केली.

या वेळी धारूर पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी कांदे साहेब, आदर्श सरपंच अमोल जगताप, ग्रामपंचायत अधिकारी बाळासाहेब झोंबाडे,तसेच ग्रामपंचायतीचे सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावात स्वच्छता, वृक्षारोपण, पाणीपुरवठा, वीज व्यवस्थापन आणि डिजिटल ग्रामपंचायत व शाळा,पिठाची गिरणी, गरम पाणी या उपक्रमांची अंमलबजावणी होत असल्याचे पाहून अधिकारी वर्गांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदर्श सरपंच अमोल जगताप यांनी केले तर सीईओ जितिन रहमान साहेब व सहाय्यक गटविकास अधिकारी कांदे साहेब यांनी गावकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामपंचायत अधिकारी बाळासाहेब झोंबाडे यांनी केले.

# आहेर चिंचोली येथील ८५ शेतकऱ्यांना नामच्या वतीने मोफत



ॲड.अजित देशमुख यांच्या हस्ते वाटप

बीड (प्रतिनिधी) आहेर चिंचोली या गावाला पुराच्या पाण्याने मोठा तडाखा बसला होता. बंधाऱ्या लगत आणि नदी किनारी असलेल्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. तसेच नदीचे पात्र देखील बदलले होते. या गावातील ८५ शेतकऱ्यांना नाम फाउंडेशन माध्यमातून आलेले मोफत बियाण्याचे वाटप स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड.अजित एम. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

यावर्षीच्या पावसाळ्यामध्ये पुराच्या पाण्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले. नाम फाउंडेशनच्या वतीने पात्र शेतकऱ्यांची निवड करून त्यांना मोफत बियाण्याचे वाटप करण्याचे नियोजन ठरवण्यात आले होते. नाम फाउंडेशनने बीड जिल्ह्यात एक हजार शेतकऱ्यांना मोफत बियाणे देण्याचे उद्दिष्ट ठरवले होते.

हरभरा आणि ज्वारी या बियाण्यांचे वाटप करण्यात आले. चिंचोली गावचे रहिवासी ॲड.महादेव तुपे, ॲड.उमेश रकटे, तसेच ॲड.बाळासाहेब गायकवाड, दिनकर सुरवसे पाटील यांनी विशेष सहकार्य केले. तसेच गणेश रकटे, संतराम चव्हाण, काशिनाथ सुरवसे, सुभाष काळे, कर्ण बहिर, भारत बहिर, रामनाथ सुरवसे, जनार्धन रकटे या आणि इतर शेतकऱ्यांना याचा लाभ देण्यात आला. शेतकऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना नाम फाउंडेशनचे आभार मानले.

# पदवीधरांनी पदवीधर मतदार म्हणून नोंदणी करून लोकशाहीच्या प्रक्रियेत सहभागी व्हावे-सिद्धेश्वर मुंडे

बीड (प्रतिनिधी) : सध्या छत्रपतीसंभाजीनगर/औरंगाबाद विभागातील बीड, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर व धाराशिव या ८ जिल्ह्यातील रहिवाशी असलेल्या पदवीधर मतदारांची नाव नोंदणी सुरु असून ज्यांची पदवी १नोव्हेंबर २०२२ रोजी पूर्ण झाली आहे व ज्यांचे यापूर्वी मतदार म्हणून नाव होते त्या सर्वांनी नव्याने येत्या ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ऑफलाईन किंवा ऑनलाईन पद्धतीने नाव नोंदणी करून लोकशाहीच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन सिद्धेश्वर मुंडे यांनी केले आहे.

६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत पदवीधर मतदारांनी स्वतःची नाव नोंदणी करणे आवश्यक आहे,त्यासाठी नमुना नंबर १८ चा फॉर्म भरून त्यावर पासपोर्ट साईज फोटो चिकटवून,पदवी उत्तीर्ण असलेल्या मार्क मेमोची झेरोक्स,आधारकार्डची झेरॉक्स स्वसांक्षांकित करून तहसील कार्यालयात ओंफलाईन पद्धतीने जमा करावा किंवा निवडणूक आयोगाच्या mahaelection.gov.in या website वर जाऊन स्वतःची सविस्तर माहिती भरून,त्यात निवडणूक विभागाच्या Votersearch या साईटवर जाऊन आपला सध्या मतदार म्हणून ज्या विधानसभा मतदारसंघात नोंद आहे तो भाग,केंद्र क्रमांक,मतदान क्रमांक व ईपीक क्रमांक टाकून,ऑनलाईन फॉर्म भरताना विचारलेली संपूर्ण माहिती भरून त्या सोबत पदवी मार्कमेमो व आधारकार्ड PDF मध्ये २०० KB साईज ,फोटो व स्वाक्षरी JPG मध्ये १०० घइ साईज मध्ये अपलोड करून फॉर्म भरून या प्रक्रियेत सहभागी व्हावे असे आवाहन सिद्धेश्वर मुंडे यांनी केले आहे.

# पार्श्वभूमी



## बाबुराव शिंदे यांचे निधन



खळेगाव दि २५(प्रतिनिधी)- गेवराई तालुक्यातील मौजे खळेगाव येथील कष्टकरी बाबुराव शेषेराव शिंदे यांचे शनिवारी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झक्याने दुःखद निधन झाले यामुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.बाबुराव शेषेराव शिंदे यांचे पहाटेच्या दरम्यान हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखत निधन झाले आहे. बाबुराव शिंदे हे कष्टकरी होते. एक चांगला माणूस म्हणून त्यांचे गावात नाव घेतले जात होते अशातच हृदयविकाराने त्यांचे निधन झाले त्यांच्यावर खळगाव येथे सकाळी ११ वाजता दुःखमय पान २ वर

## महादेव नन्नवरे यांचे निधन



खालापुरी (प्रतिनिधी):- शिरूर कासार तालुक्यातील आर्वी येथील जेष्ठ नागरिक तथा समाजातील व्यक्तिमत्त्व महादेव बापुराव नन्नवरे (वय ६२) यांचे शनिवार (ता. २५) रोजी अल्प आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

नन्नवरे यांनी आयुष्यभर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि लोकसेवेची भावना जपली. त्यांचा स्वभाव मितभाषी, परंतु मदतीस तत्पर असा होता. पान २ वर

## डॉ.संपदा मुंडे यांच्या आत्महत्यास कारणीभूत असणाऱ्यांची सखोल चौकशी करून फाशी द्या-ॲड.आनंद काळे



वडवणी( प्रतिनिधी ):-तालुक्यातील कवडगाव येथील डॉ. संपदा मुंडेयांच्या आत्महत्येस कारणीभूत असलेल्या नराधमांना तत्काळ फाशी देण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ॲड.आनंद काळे यांनी केली आहे. आ.प्रकाश सोळंके व जयसिंग सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा लढा उभारून मुंडे कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरणार असल्याचे ते म्हणाले. वडवणी तालुक्यातील कवडगाव येथील रहिवाशी व फलटण उपजिल्हा रुग्णालयातील डॉ.संपदा हिने आई-वडिलांच्या कष्टाचे चीज करीत मोठ्या धैर्याने शिक्षण घेतलं होतं. डॉक्टर झाल्यानंतर सातारा जिल्ह्यात नोकरी लागली होती, मात्र तेथील पोलीस अधिकाऱ्याने तिचा जाणीवपूर्वक छळ केला. वेळोवेळी झालेल्या छळाला वाचा फोडण्यासाठी तिने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडे तक्रार केली होती. मात्र वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने देखील लक्ष दिल नाही. वरिष्ठांकडे तक्रार केल्याचे माहिती झाल्यानंतर फलटणच्या पोलिसांनी तिला अधिकच त्रास देणे सुरू केले. या त्रासाला कंटाळून तिने अखेर आत्महत्या केली. तिच्या आत्महत्यास कारणीभूत ठरलेले पोलीस अधिकाऱ्यांना शासनाने तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी राष्ट्रवादी युवा नेते ॲड.आनंद काळे यांनी केली आहे.

## माजलगावच्या न.प.निवडणुकीत आता येणार पक्षांतराला उधाण

# राजकीय सोयीसाठी अनेकांची तयारी उमेदवारीची तयारी परंतु पक्ष ठरेना



माजलगाव दि.२५ (प्रतिनिधी)- स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. नगर परिषद चे वार्ड ठरले, आरक्षणही निश्चित झाले; मात्र कोणत्या पक्षातून लढायचे, हे अद्याप अनिश्चित. परिणामी, कोणत्या पक्षातून उमेदवारी कोण घेणार, अशी संभ्रमावस्था अनेक वार्डामध्ये दिसत आहे. महायुती, महाविकास आघाड्यातर्गत जागावा टपावरून आतापासूनच रस्सीखेच सुरू झाली आहे. त्यामुळे विरोधकांच्या निर्णयावरच अनेकांची भूमिका स्पष्ट होणार आहे. जागा वाटपात वार्ड मित्रपक्षाकडे गेला, तर अनेकांनी पक्षांतराचीही तयारी केली आहे. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केवळ राजकीय सोयीसाठीच पक्षांतराला उधाण येणार, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून मुदत संपूनही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तीन ते चार वर्षांपासून लांबणीवर पडल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने गतवेळच्या निवडणुकांप्रमाणेच ओबीसी प्रवर्गाचे आरक्षण ठेवण्याचा निर्णय दिल्याने जिल्हा परिषद, पंचायत समित्यांसह, नगरपरिषदांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. न.प. वार्डाच्या पुनर्रचनेसह आरक्षण प्रक्रियाही पार पडली आहे. त्यामुळे या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. सभागृहाची मुदत संपल्यापासून अनेकांनी या निवडणुकीची तयारी केली आहे; परंतु बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे निवडणुकीपूर्वीच अनेकांच्या अडचणी वाढू लागल्या आहेत.

नगरपरिषद, सभागृहाची मुदत संपून साडेतीन ते पावणे चार वर्षांचा कालावधी लोटला आहे. या काला वधीत अनेकांनी संभाव्य न.प. वार्डाचे आरक्षण गृहीत धरूनच तयारी सुरू केली होती. अगदी वाढदिवसा पासून लग्न समारंभ ते सार्वजनिक कार्यक्रमांना ही आवर्जून उपस्थिती लावली जात होती; मात्र आरक्षणानंतर अनेकांचे मनसुबे उधळल्याने पान २ वर

### नेत्यांची सोय,कार्यकर्त्यांची गोची

इच्छुकांची वाढती संख्या लक्षात घेऊन सर्वच पक्षांच्या स्थानिक नेत्यांनी सावध भूमिका घेतली आहे. लोकसभा, विधानसभा आणि गतवेळच्या स्थानिक स्वराज्य संस्थांसह सहकारातील निवडणुकां मधील 'बदला' घेण्याच्या दृष्टीने आतापासूनच व्यूहरचना आखली जात आहे. सत्तापदांच्या लालसेतून नेत्यांनी घेतलेली सोयीची भूमिका आता कार्यकर्त्यांसाठी अडचणीची ठरत आहे. अनेकांच्या उमेदवारीवरही गदा येणार, अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे.

### पोलिसांनी केला हायवासह जेसीबी जप्त

# माजलगाव धरण परिसरात मुरूमाचे उत्खनन जोरात सुरू



माजलगाव दि.२५(प्रतिनिधी) - माजलगाव धरण परिसरात जेसीबी च्या साह्याने मुरूम उत्खनन करत असल्याची खबर मिळाल्यावर उपविभागीय पोलीस अधिकारी शैलेश गायकवाड यांच्या पथकाने दि.२२ रोजी एक जेसीबी व एक हायवा ताब्यात घेतली असून उत्खनन करणारे मात्र तेथून फरार झाले आहेत.

आज जवळ मुरमाचे उत्खनन हायवासह जेसीबी जप्त माजलगाव प्रतिनिधी माजलगाव धरण व दिनांक २२/१०/२०२५ रोजी ००.१५ वा. शैलेश सुधाकर गायकवाड उपविपोअ माजलगाव यांना मिळालेल्या गुप्त बातमीदार मार्फत माहीती मिळाली की, माजलगाव डॅमकडे जाणारे रस्ताचे बाजुला अग्निशकन कार्यालयाचे पान २ वर

## जिल्ह्यात ३० पर्यंत विजांसह जोरदार पावसाचा इशारा


**शेतकऱ्यांनो सावधान** | जिल्हा प्रशासनाकडून विविध सूचना



बीड दि. २५(प्रतिनिधी):-पुढील काही दिवस जिल्ह्यात पावसाचा जोर वाढणार असून २४ ऑक्टोबरपासून पावसाची तीव्रता वाढण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. २६ ते ३० ऑक्टोबर दरम्यान बीड, पाटोदा, माजलगाव, अंबाजोगाई, धारूर, गेवराई, परळी, माजलगाव परिसरात विजा व मेघगर्जनेसह मध्यम ते जोरदार तसेच स्थानिक पातळीवर मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रात तयार झालेल्या दोन कमी दाबाच्या प्रणालीमुळे राज्यात ट्रफलाईन तयार होत असून पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. १ ते ४ नोव्हेंबरदरम्यानही विखुरलेल्या स्वरूपातील पावसाचा अंदाज असून ५ नोव्हेंबरपासून पावसाचा प्रभाव हळूहळू कमी होणार आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांनी विशेष दक्षता घेणे अत्यावश्यक असल्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले. कापूस, सोयाबीन, ज्वारी अशा काढणी आलेल्या पिकांचे उत्पादन सुरक्षित साठवून ठेवावे, धान्य तसेच कापूस ओल्या ठिकाणी ठेवू नये आणि जनावरांची शेड सुरक्षित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. विजांचा कडकडाट झाल्यास शेतात काम करण्यापासून दूर राहावे तसेच टॉवर, झाडे किंवा लोखंडी वस्तू जवळ उभे राहणे धोकादायक असल्याचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी नमूद केले आहे. नाले - ओढ्यांमध्ये अचानक पाणी वाढण्याची शक्यता असल्याने वाहतुकीदरम्यान खबरदारी घ्यावी आणि शाळा, अंगणवाड्या व आपत्कालीन यंत्रणा सतर्क ठेवाव्यात असे उपविभागीय अधिकारी कविता पान २ वर

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची राज्यशासनाकडून क्रूरचेष्टा-कॉ.नागरगोजे



पाटोदा प्रतिनिधी :- यावर्षी बीड जिल्ह्यात पाऊसाने थैमान घातले असुन शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावला शेतकऱ्यांचे जनजीवन विस्कळीत झाले असुन या पाऊसाने शेतकऱ्यांच, आतोनात नुकसान झाले मात्र राज्यशासनाने शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत देऊन हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांची क्रूर चेष्टा चालवली आहे राज्य शासनाने बीड जिल्हा ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी ५० हजार रुपयाची मदत देण्याची मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्ष व महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने कॉम्रेड महादेव नागरगोजे व इतरांनी मा.उपविभागीय अधिकारी साहेब यांच्या मार्फत शासनाकडे केली आहे.दिलेल्या निवेदनात हटले आहे कि बीड जिल्ह्यात तब्बल एक महिन्यापासून सततधार व त्यातही दि.१८,१९,२१,२२ सप्टेंबरच्या पान २ वर

## जैतापूरच्या सरपंचाची गोरगरिबांना फराळ वाटप करून दिवाळी साजरी



दिंद्रुड दि.२५ (प्रतिनिधी)- धारूर तालुक्यातील जैतापुर येथील सरपंचांनी ग्रामपंचायत हद्दीतील गोरगरिबांसोबत दिवाळी फराळ वाटप करत दिवाळी साजरी केली. गेल्या सात वर्षांपासून करत असलेल्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

येथील सरपंच छाया भागवत दराडे या गेल्या पान २ वर

### डॉ.संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणी

## चौसाळा बसस्थानक येथे निदर्शने



बीड दि २५ (प्रतिनिधी)- सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या बीड जिल्ह्याच्या भुमिकन्या डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येप्रकरणी दोषींवर कठोर कारवाईची मागणी करत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या मार्गदर्शनात शिवशक्ती भीमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली शनिवार दि.२५ रोजी बीड तालुक्यातील चौसाळा बसस्थानका समोर सर्वपक्षीय आणि सामाजिक संघटनांच्या वतीने निदर्शने करण्यात आली. डॉ. संपदा मुंडे (रा. कोठारबन, ह.मु. कवडगाव, ता. वडवणी, जि. बीड) यांनी फलटण येथे कार्यरत असताना पोलिस उपनिरीक्षक गोपाल बदने आणि घरमालकाचा मुलगा प्रशांत बनकर यांच्या शारीरिक व मानसिक छळामुळे आत्महत्या पान २ वर

## शरद काळे यांची नियुक्ती



अंबाजोगाई दि २५(प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सोशल मीडिया सेलचे प्रदेशाध्यक्ष आनंद पवार यांच्या आदेशाने तसेच पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण व माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या शिफारशीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अंबाजोगाई सोशल मीडिया तालुका अध्यक्ष पदी शरद काळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नियुक्ती चे पत्र राजकिशोर मोदी व पान २ वर

### सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांच्याकडून

## जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या प्रकृतीची विचारपूस



बीड (प्रतिनिधी):-शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांना श्वसनाचा त्रास झाल्याने तीन दिवसांपूर्वी बीड येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. याची माहिती मिळताच आज शुक्रवारी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी मूळुक यांची भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली.

शिवसेनेचा प्रत्येक झेंडा जोमाने फडकवणारे, प्रत्येक शिवसैनिकाला साथ देणारे आणि अडचणीतही हसतमुखाने उभे राहणारे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांना हृदयावर सूज व श्वसनाचा त्रास जाणवल्याने मंगळवारी (दि. २१) त्यांना बीड येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या घटनेची माहिती मिळताच पान २ वर

## त्रिंबक गायगवे (जिनु आण्णा) यांचे निधन



माजलगाव, दि. २५ प्रतिनिधी : शहरातील झेंडा चौक भागातील रहिवाशी असलेले त्रिंबक पांडुरंग गायगवे (जिनु आण्णा) (वय ७२ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने दि.२४ ऑक्टोबर रोजी रात्री १०:१५ वाजता दुःखद निधन झाले.

तालुक्यातील घळाटवाडीसह अनेक ठिकाणी स्वस्त धान्य दुकानदार म्हणुन त्यांनी काम केल्याने सर्वपरिचीत होते तर प्रगतशील शेतकरी म्हणुन देखिल त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनाने शोककळा पसरली असुन त्यांच्या पार्थीव देहावर सिंदफणा स्मशानभुमीत अंत्यसंस्कार दि. २५ ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात आले. त्यांच्या पश्चात गणेश गायगवे, अर्जुन गायगवे असे दोन भाउ, शकुंतला, शशिकला अशा दोन बहिणी, पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. भुसार मालाचे व्यापारी शाम व दिगंबर गायगवे यांचे ते वडील होत.

## निष्ठा,प्रामाणिकपणा व कर्तुत्ववान सेवेमुळे जे.आर.पवार उत्कृष्ट प्रशासक ठरले-माजी मंत्री बाळासाहेब थोरात

### वृद्धेश्वर कारखान्याच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी पवार यांचे योगदान-आ.राजळे

कडा दि.२५(प्रतिनिधी):-आपल्या कामाप्रती निष्ठा, कार्यतत्परता, प्रामाणिकपणा आणि कर्तृत्ववान सेवा यामुळे जे.आर. पवार हे उत्कृष्ट प्रशासक ठरले आहेत. तसेच ते एक कुटुंब वत्सल व्यक्ती असल्यामुळे त्यांनी आपला गोतावळा जपून ठेवला असे गौरवोद्गार राज्याचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आष्टी तालुक्यातील पिंपळा येथे आयोजित कृतज्ञता सोहळ्यामध्ये काढले. अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या आस्थापनेतून कार्यकारी संचालक व कार्यकारी सल्लागार या पदावरून पवार




नुकतेच निवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांच्या जन्मगावी पिंपळा येथे शुक्रवार दि २४ ऑक्टोबर २०२५ कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता. पुढे बोलताना मा.थोरात म्हणाले की पाथर्डी सारख्या दुष्काळी भागातील, तीन वर्षे बंद पडलेला वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना त्यांनी आपल्या कार्य कुशलतेने यशस्वीपणे आज तागायत चालवून दाखवला. वृद्धेश्वरचे सर्वेसर्वा राजळे कुटुंबाला पवार साहेब हे आपल्या कुटुंबापैकीच एक वाटतात. आणि त्यांच्या जन्मगाव पिंपळा परिसरातील लोकांनाही ते आपलेच वाटतात.सर्वच क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये नोकरदार वयाच्या ५८ ते ६० वर्षापर्यंतच निवृत्त होतात. परंतु उत्कृष्ट प्रशासक या संज्ञेस पात्र असणारे पवार साहेब मात्र वयाच्या ७१ व्या वर्षी पान २ वर

### लोकसंसद जन प्रेरणा शिखर पुरस्काराने


## डॉ.मुंडे,पत्रकार महाजन व सरपंच जगताप यांचा होणार मुंबईत गौरव





किल्ले धारूर (प्रतिनिधी):- क्रांती ग्रामविकास संस्था तथा विश्वनायक लोकसंसद फाउंडेशन यांच्या वतीने लोकसंसद जन प्रेरणा शिखर पुरस्काराने धारूर येथील वैद्यकीय व्यावसायिक डॉ प्रल्हाद एस मुंडे ,पत्रकार अनिल महाजन व आदर्श गाव आवरगावचे सरपंच अमोल जगताप यांचा सन्मान दि. २८ ऑक्टोबर रोजी मुंबईत करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे प्रमुख सुरेश यादव यांनी दिली आहे त्यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. क्रांती ग्रामविकास संस्था तथा विश्वनायक लोकसंच पान २ वर

# मोगरा येथील गोदाकाठच्या बाधित शेतकऱ्यांच्या सोयाबीन व कापुस पिकाची लागली वाट



### एकरी दिड हजाराचे उत्पादन; खर्च मात्र आठ ते दहा हजार

माजलगाव, दि. २५ प्रतिनिधी: तालुक्यातील मोगरा हे गाव गोदावरी नदीकाठी वसलेले आहे. गोदावरी नदीला जोडणारे गावाच्या जवळ तिन ते चार मोठाले ओढे असल्यामुळे त्या ओढ्यातुन महापुरामध्ये आलेले पाणी शेतक-यांच्या उभ्या पिकांत पाच फुट उंचीपर्यंत शिरल्यामुळे सोयाबीन व कापुस ही पिके आठ दिवस पाण्यात राहिल्यामुळे उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले असुन एकरी हजार ते दिड हजार रूपयांचे नासके उत्पादन शेतक-यांच्या पदरात पडत आहे. त्यामुळे गोदाकठचा बाधित शेतकरी पुर्णतः कंबरेत मोडला असुन या शेतक-यांसाठी आमदार प्रकाश सोळंके यांनी व शासनाने तात्काळ वेगळे पंचनामे करून वेगळी मदत तात्काळ द्यावी अशी मागणी मोगरा गावातील बाधित शेतकरी वर्गातुन केली जात आहे.

माजलगाव तालुक्यात सिंदफणा व गोदावरी या दोन प्रमुख व मोठ्या नद्या आहेत. मागील काही दिवसांपूर्वी झालेल्या प्रचंड पावसामुळे आलेले महापुर हे शेतक-यांसाठी मोठे संकट घेवुन आले होते. या नद्यांच्या महापुरामुळे अनेक शेतक-यांच्या जमिनी खरडुन गेल्या. उभ्या पिकांमध्ये आठ ते दहा दिवस पाणी साचले. ज्यामुळे कापुस, सोयाबीन ही उभी असलेली पिके पुराच्या पाण्याने नासुन गेली. पान २ वर

CMYK